cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१६४ | शुक्रवार, दि.१० ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### वाढते रस्ता अपघात चिंता वाढवणारे

देशातील रस्ते सुरक्षा उपाययोजनांची गंभीर दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी राज्य सरकार, केंद्रशासित प्रदेश आणि भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) आदींना निर्देश दिले आहेत. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने २०२३ मधील देशातील रस्ते अपघातांची आकडेवारी प्रसिद्ध केली. त्यात रस्ते अपघातांत १,७२,८९० जणांचा मृत्यू झाला असून, हा आकडा वाढतच असल्याचे म्हटले आहे. देशभरातील अपघातांत ३५ हजारहून अधिक पादचाऱ्यांचा मृत्यू झाला.

### अभिनेता थलपती विजयचे घर बॉम्बने उडवण्याची धमकी

चेन्नई: तामिळनाडूचे सुपरस्टार अभिनेता आणि तमिळागा वेट्री कझागम पक्षाचे प्रमुख थलपति विजय यांच्या नीलांकराई येथील निवासस्थानाला बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाल्यानंतर संपूर्ण चित्रपटसृष्टी आणि राजकीय वातावरणात खळबळ उडाली. गुरुवारी (दि. ९ ऑक्टोबर २०२५) सकाळी ही धमकी मिळताच केंद्र सरकारकडून वाय प्लस श्रेणीची सुरक्षा असलेल्या विजय यांच्या कपालीश्वर नगरातील घराभोवती पोलिस आणि बॉम्ब निरोधक पथकाची हालचाल सुरू झाली. मात्र, स्निफर डॉग्स आणि तज्ज्ञांच्या तपासानंतर ही धमकी खोटी असल्याचे समोर आले. धमकी कन्याकुमारी भागातून दिली गेल्याचे सूत्रांकडून समोर आले असून, पोलिसांनी कॉलरचा शोध घेण्यासाठी तात्काळ तपास सुरू केला आहे.

## थोडक्यात...

### धर्मांतर पीडितावरही कारवाई करता येते – हायकार्ट

अहमदाबाद: जर एखादी व्यक्ती धार्मिक धर्मांतराचा ''पीडित'' असल्याचा दावा करते; परंतु नंतर इतरांना धर्मांतर करण्यासाठी दबाव आणत असेल तर त्याच्यावर कायदेशीर कारवाई करता येते,'' असे गुजरात उच्च न्यायालयाने म्हटले आहे. न्यायमूर्ती नीरज देसाई यांच्या न्यायालयाने धर्मांतर प्रकरणातील पीडित असल्याचा दावा करणारी याचिका फेटाळून लावताना हे निरीक्षण नोंदवले. न्यायालयाने म्हटले आहे की जेव्हा कोणी इतरांना धर्मांतर करण्यासाठी दबाव आणतो किंवा प्रवृत्त करतो, तेव्हा ते देखील गुन्ह्याच्या श्रेणीत येते. भरुच जिल्ह्यातील आमोद पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्यानुसार, तीन व्यक्तींनी अंदाजे ३७ हिंदू कुटुंबांमधील १०० हून अधिक लोकांना प्रलोभन दाखवून इस्लाम धर्म स्वीकारला. एका व्यक्तीने विरोध केला तेव्हा त्याला धमकावण्यात आले, त्यानंतर त्याने पोलिस तक्रार दाखल केली होती.

### न्यायाधीशच सायबर गुन्हेगारांच्या फंदात

अमरावती : शहरातील सेवानिवृत्त न्यायाधीशाची तब्बल ३१ लाखांनी सायबर फसवणुक झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ही घटना २५ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर दरम्यान घडली असून, ८ ऑक्टोबर रोजी ती समोर आली. सेवानिवृत्त न्यायाधीशांना २५ सप्टेंबर रोजी एका अज्ञात व्यक्तीने व्हॉट्सअॅप व्हिडिओ कॉल केला. त्या इसमाने स्वत:ला सीबीआय अधिकारी म्हणून ओळख दिली आणि त्यांच्या बँक खात्यातील व्यवहारांमध्ये अनियमितता झाल्याचे सांगितले. त्यानंतर न्यायाधीशांना 'डिजिटल अरेस्ट' करण्यात आल्याचे सांगत आरोपींनी त्यांना घराबाहेर न जाण्याचा इशारा दिला. पुढील काही दिवस आरोपींनी सतत संपर्क ठेवत ३१ लाख रुपयांची मागणी केली. आरोपींच्या धमक्यांमुळे न्यायाधीशांनी अखेर ३ ऑक्टोबर रोजी आरोपींनी दिलेल्या खात्यात ३१ लाख रुपये पाठवले. त्यानंतर आरोपींनी त्यांना डिजिटल अरेस्ट संपल्याचे सांगून संपर्क तोडला.

### लैंगिक शिक्षण लहान वयापासूनच ठेवा–न्यायालय

दिल्ली: 'मुलांना देण्यात येणारे लैंगिक शिक्षण हे केवळ इयत्ता नववी ते बारावीपर्यंत मर्यादित न ठेवता लहान वयापासून शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट केले पाहिजे,'' असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी (८ ऑक्टोबर) नोंदवले. अल्पवयीन आरोपीच्या जामीन अर्जावर सुनावणी करताना न्यायाधीश संजय कुमार आणि न्यायाधीश आलोक आराधे यांच्या खंडपीठाने लैंगिक शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.

### कफ सिरप प्रकरणी मालकाला अटक

चेन्नई: विषारी कोल्ड्रीफ कफ सिरप पिल्यानं मध्य प्रदेशातील २२ लहान मुलांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर आता मध्य प्रदेश पोलिसांनी मोठी कारवाई केली असून, चेन्नईमधुन स्रेसन फार्मासिटिकल्सचे मालक जी रंगनाथन यांना अटक करण्यात आली आहे. ७३ वर्षाचे रंगनाथन हे मद्रास मेडिकल कॉलेजमधून पासआऊट झालेले आहेत.

# दिवाळीआधी केंद्राकडून शेतकऱ्यांसाठी ४२ हजार कोटींची भेट ?

## दोन दिवसांत मोठी घोषणा होण्याची शक्यता, शेतमाल उत्पादकता वाढवण्यासाठी प्रयत्न

पुणे । प्रतिनिधी

**शेतकऱ्यांना पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या २१ व्या हप्त्याची प्रतीक्षा लागली असतानाच, केंद्र सरकारने शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वाची माहिती दिली आहे. ११ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी शेतकऱ्यांची प्रगती आणि समृद्धीसाठी ४२ हजार कोटींहून अधिक खर्चाच्या ऐतिहासिक योजनांची भेट देतील. या दिवशी पंतप्रधान मोदी कडधान्ये अभियान आणि पंतप्रधान धन-धान्य कृषी योजना या दोन्ही अत्यंत महत्त्वाच्या योजनांचा नवी दिल्ली येथून शुभारंभ करतील, अशी माहिती केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी गुरुवारी दिली.**

देशभरात शेतमाल उत्पादकता एकसमान नाही; काही भागात ती खूप कमी आहे तर काही भागात अधिक आहे. आम्ही कमी उत्पादकता असलेले जिल्हे ओळखून आणि त्यांची उत्पादकता वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचा निर्णय घेतला आहे. जर कमी प्रमाणात उत्पादकता असलेल्या जिल्ह्यांचे उत्पन्न राष्ट्रीय सरासरीच्या बरोबरीने आणले तर देशाचे एकूण उत्पादन वाढण्यास मदत



होईल. यामुळे देशांतर्गत गरज पूर्ण होईल आणि त्या संबंधित जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढेल. आम्ही अशा १०० जिल्ह्यांची निवड केली असून ज्यावर आमचे लक्ष केंद्रित असेल. पंतप्रधान धन-धान्य कृषी योजनेअंतर्गत या जिल्ह्यांमध्ये उत्पादकता वाढवण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे चौहान यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, भारत अजूनही कडधान्यांच्या बाबतीत स्वावलंबी झालेला नाही. कडधान्यांत आत्मनिर्भर होण्यासाठी, २०३०-३१ पर्यंत कडधान्ये अभियान निश्चित केले आहे. या दरम्यान, कडधान्यांच्या लागवडीखालील क्षेत्र २७५ लाख हेक्टरवरून ३१० लाख हेक्टरपर्यंत वाढवण्याचे लक्ष्य ठेवले आहे. त्याचबरोबर, कडधान्यांचे ▶▶ पान २ वर

# घुलेचा दोष मुक्तीचा अर्ज फेटाळला

## संतोष देशमुख हत्येप्रकरणी पुढील सुनावणी २८ ऑक्टोबरला

बीड । प्रतिनिधी


**मस्साजोग (ता. केज) येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण आणि हत्येच्या घटनेतील मुख्य आरोपी सुदर्शन घुले याचा दोषमुक्तीचा अर्ज गुरुवारी (दि नऊ) विशेष मकोका न्यायालयाने फेटाळला. या प्रकरणाची पुढील सुनावणी २८ ऑक्टोबरला होणार आहे.**

या प्रकरणातील मुख्य सूत्रधार वाल्मीक कराड याचा दोषमुक्तीचा अर्ज आणि जमीन फेटाळल्यानंतर विष्णू चाटेसह इतर आरोपींनी दोषमुक्तीसाठी येथील विशेष मकोका न्यायाधीश व्यंकटेश पटवदकर यांच्यासमोर अर्ज केले होते. यापूर्वीच विष्णू चाटे याचाही अर्ज नामंजूर झाला आहे. दरम्यान, या प्रकरणातील सुदर्शन घुले, सुधीर सांगळे, प्रतीक घुले, महेश केदार, जयराम चाटे यांचे दोषमुक्ती अर्ज आणि वाल्मीक कराड तसेच या आरोपींच्या मालमत्ता जप्तीच्या ▶▶ पान २ वर

# राज्यातील सर्व शासकीय कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीला

छ.सभाजीनगर/ बीड । पतिनिधी

**राज्यात अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तीग्रस्त नागरिकांना मदत म्हणून राज्यातील सर्व शासकीय कर्मचारी शासनाच्या अंगीकृत उपक्रम मधील कर्मचारी या सोबतच आयपीएस, आयएएस या सर्व कर्मचाऱ्यांचे माहे ऑक्टोबर २०२५ च्या मासिक वेतनातील एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधी मध्ये देणगी म्हणून देण्याचे निर्देश गुरूवारी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी, जिल्हा परिषदेचे सिओ, नगरपालिकेचे सीओ,**



**महामंडळ अधिकारी यांना देण्यात आले आहेत.**

राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने एक परिपत्रक जारी करत राज्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तीत आपत्तीग्रस्त नागरिकांच्या मदतीसाठी राज्य शासन कसोशीने प्रयत्न करत आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ आणि राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र महासंघाशी सलग्न सर्व विभागातील अधिकारी आणि कर्मचारी देखील कर्तव्य भावनेने एक दिवसाचे वेतन या मदत कार्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये जमा करण्यास इच्छुक असल्याबाबत त्यांच्या ▶▶ पान २ वर

# मनोज जरांगे, राधाकृष्ण विखे यांच्यात बंद दाराआड चर्चा

जालना। प्रतिनिधी

हैदराबाद गॅझेटिअर लागू करण्याच्या शासन निर्णयाला वाढता विरोध आणि कुणबी प्रमाणपत्राबाबत निर्माण झालेल्या शंकांदरम्यान मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी गुरूवारी अचानक अंतरवली सराटी येथे मराठा आंदोलक मनोज जरांगे यांची भेट घेतली. अंतरवली सराटीतील सरपंचांच्या निवासस्थानी बंद दाराआड झालेल्या या भेटीत नेमकी काय चर्चा झाली, हे स्पष्ट होऊ शकले नाही.

कुणबी प्रमाणपत्राबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत असताना विखे आणि जरांगे यांच्यातील भेटीने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. या भेटीनंतर विखे यांनी मराठा समाजातील विषमतेचे खापर शरद पवार यांच्यावर फोडले. ''१९९४ मध्ये मराठा समाजाचा विचार केला असता तर ही परिस्थिती उद्भवलीच नसती,'' असा आरोप त्यांनी केला.

# मराठा समाजाला आमच्यातून आरक्षण नको !

## मुंबईतील आझाद मैदानावर कुणबी समाजाचा एल्गार

मुंबई । प्रतिनिधी

**मुंबईच्या आझाद मैदानावर गुरूवार दि. ९ ऑक्टोबर रोजी कुणबी समाजाने मोर्चाचे आयोजन केले होते. मराठा समाजाला कुणबी नोंदीद्वारे ओबीसी आरक्षणात समाविष्ट करण्याच्या सरकारी धोरणाला कुणबी समाजाने या मोर्चातून तीव्र विरोध दर्शविला. या पार्श्वभूमीवर सकाळपासूनच शेकडो कुणबी कार्यकर्ते आझाद मैदानावर दाखल झाले. त्यांच्या डोक्यावर 'जय कुणबी' लिहिलेल्या गांधी टोप्या आणि**



**हातात निषेधाचे फलक पाहायला मिळत होते.**

आझाद मैदानावर मोठे व्यासपीठ आणि मंडप उभारण्यात आला होता. सकाळी दहा वाजल्यानंतर ओबीसी समाजाचे नेते या व्यासपीठावरून आंदोलनकर्त्यांना मार्गदर्शन करत होते. या आंदोलकांची मुख्य मागणी ही मराठा समाजाच्या ▶▶ पान २ वर

# योगेश कदमांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा–अनिल परब



मुंबई । प्रतिनिधी

मुली नाचवून जे लोक दलालीचे पैसे खात आहेत ते गँगस्टर लोकांना पोसण्याचे काम करत आहेत. गँगस्टरच्या हातात अधिकृत शस्त्र परवाना देण्याचे काम गृह राज्यमंत्री करत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नेमकी अडचण काय? अशा मंत्र्यांना सोबत घेऊन स्वत:ची प्रतिमा मलिन का करत आहेत, हे कळत नाही. योगेश कदम यांची ताबडतोब मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा. अधिवेशनात आम्ही आवाज उचलू मात्र योगेश कदम यांची हकालपट्टी केल्याशिवाय शिवसेना गप्प बसणार नाही. लोकांच्या सुरक्षेची सरकारला काही पडली नसेल परंतु ▶▶ पान २ वर




# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या न्यायासाठी हिवाळी अधिवेशन तीन आठवड्यांचे घ्या–रोहित पवार

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन ८ डिसेंबरपासून नागपूर येथे सुरू होणार आहे. सरकारने या अधिवेशनाचे कामकाज दहा दिवसांचे ठरवले असून, अधिवेशन ७ ते २० डिसेंबरदरम्यान पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी गुरुवारी (दि. ९) त्यांच्या अधिकृत ट्विटद्वारे सरकारवर टीका केली. त्यांनी एक्सवर लिहिले की, शेतकऱ्यांना भरीव मदत देण्याची दानत तर दाखवली नाही, आता किमान तीन आठवड्यांचे अधिवेशन घेण्याची हिंमत तरी दाखवावी.



पवार यांनी म्हटले की, अधिवेशन डिसेंबर महिन्यातील पहिल्या आठवड्यात दोन दिवस, दुसऱ्या आठवड्यात पाच दिवस आणि तिसऱ्या आठवड्यात तीन दिवस सभागृह ▶▶ पान २ वर

# राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी प्रारूप मतदार यादी जाहीर

मुंबई । वृतसंस्था

राज्यातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या तसेच नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी प्रारूप मतदार यादी गुरूवारी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीतील नावे शोधण्यासाठी नागरिकांना https://mahasecvoterlist.in या संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने १ जुलै २०२५ हा अधिसूचित दिनांक निश्चित केला असून, त्या दिवशी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी या निवडणुकांसाठी आधार म्हणून वापरली जात आहे. या आधारे जिल्हा परिषदेच्या निवडणूक विभागनिहाय, पंचायत समितीच्या ▶▶ पान २ वर

# भ्रष्टाचारामध्ये महाराष्ट्र आघाडीवर

## ७८५ शासकीय कर्मचारी अटकेत; देशभरात २,८७५ ठिकाणी कारवाई

मुंबई । पतिनिधी

**ठाणे महानगरपालिकेचे लाचखोर उपायुक्त शंकर पाटोळे याच्यावरील कारवाईने खळबळ उडाली असताना देशभरातील भ्रष्टाचारविरोधी कारवायांमध्ये महाराष्ट्राने आघाडी घेतल्याचे उघड झाले आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या (एनसीआरबी) २०२३ च्या अहवालानुसार, देशभरात एकूण २८७५ सापळे रचण्यात आले, यापैकी सर्वाधिक ७९५ कारवाया महाराष्ट्रात करण्यात आल्या आहेत.**

संपूर्ण देशातील कारवाईपैकी २८ टक्के सापळे हे महाराष्ट्रातच रचण्यात आले आहेत. यंदा २ ऑक्टोबरपर्यंत राज्यात ५३० सापळा कारवाया करण्यात आल्या. त्यात ७८५ शासकीय कर्मचारी आणि खासगी व्यक्तींना अटक केली. महाराष्ट्रानंतर राजस्थान (२८४) दुसऱ्या, कर्नाटक (२४५) तिसऱ्या, तर गुजरात (१८३) चौथ्या क्रमांकावर आहे. या आकडेवारीकडे राज्यातील अनेक माजी व ▶▶ पान २ वर

### सहा राज्यांमध्ये शून्य लाचखोरी

ईशान्य भारतातील आठ राज्यांपैकी आसाम, सिक्कीम सोडल्यास अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय, मिझोराम, त्रिपुरा आणि नागालँड या सहा राज्यांत एकही कारवाई झालेली नाही. आसाममध्ये ९१, तर सिक्कीममध्ये अवघी एक कारवाई झाल्याचे या अहवालात नमूद आहे. दुसरीकडे पश्चिम बंगाल, छत्तीसगड आणि गोवा या तुलनेने मोठ्या राज्यांमध्येही सापळा कारवाई शून्य आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०९ ऑक्टोबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८२.०० क्विंटल | २,२५१ | २,७५० | २,५०७ |
| ज्वारी/हायब्रिड: १५०.५० क्विंटल | १,९५० | ३,३५१ | २,४८२ |
| मका/लोकल:२३.०० क्विंटल | १,६०१ | १,६०१ | १,६०१ |
| तूर : १.५० क्विंटल | ६,१२५ | ६,१२५ | ६,१२५ |
| उडीद : १८.०० क्विंटल | ३,८०० | ५,३०० | ४,६०६ |
| बाजरी: १०६.५० क्विंटल | २,१५० | २,८३१ | २,५३९ |
| मुग: ४.०० क्विंटल | ५,३०१ | ५,४७२ | ५,३८१ |
| सोयाबीन: ४२३.५० क्विंटल | ३,२०० | ४,४०० | ३,६९३ |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,१३१ | ५,१३१ | ५,१३१ |

cmyk

## अग्रलेख

# वाढते रस्ता अपघात चिंता वाढवणारे

देशातील रस्ते सुरक्षा उपाययोजनांची गंभीर दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी राज्य सरकार, केंद्रशासित प्रदेश आणि भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) आदींना निर्देश दिले आहेत. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने २०२३ मधील देशातील रस्ते अपघातांची आकडेवारी प्रसिद्ध केली. त्यात रस्ते अपघातांत १,७२,८९० जणांचा मृत्यू झाला असून, हा आकडा वाढतच असल्याचे म्हटले आहे. देशभरातील अपघातांत ३५ हजारहून अधिक पादचाऱ्यांचा मृत्यू झाला. तसेच हेल्मेटचा वापर न केल्याने ५४ हजारहून अधिक दुचाकीस्वार, प्रवाशांचा मृत्यू झाल्याची आकडेवारी केंद्र सरकारने दिली होती. त्याची दखल घेत न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने उपाययोजनांचे निर्देश दिले आहेत. अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. एस. राजसीकरण यांनी २०१२ मध्ये याबाबत याचिका दाखल केली होती.

सुनावणी वेळी वाहनांवरील अनधिकृत लाल-निळ्या 'फ्लॅशिंग लाईट्स' आणि बेकायदेशीर भोंग्यांवर जप्ती, बाजारपेठेत कारवाई आणि दंड आकारून त्यांना पूर्ण बंदी घालण्यात यावी, असे आदेश न्यायालयाने दिले. तसेच सात महिन्यांनंतर न्यायालयाने हे प्रकरण पुन्हा सुनावणीसाठी ठेवण्याचे आदेश महाप्रबंधकांना दिले. न्यायालयाने आदेशात म्हटले आहे की, दुचाकीचालक आणि सहप्रवाशांना हेल्मेट वापरण्यासाठी कायद्यातील तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी करा. रस्ते मार्गावर विविध ठिकाणी बसवलेल्या कॅमेऱ्यांच्या साह्याने यावर अंकुश ठेवा. रस्ते मार्गिकांची (लेन) शिस्त पाळण्यासाठी उपाययोजना करा. त्यासाठी मार्गिका निश्चिती, रंगीत पट्टे आदींचा वापर करा. प्रखर एलईडी दिवे, लाल-निळे दिवे आणि बेकायदा भोंगे (सायरन) आदींवर निर्बंध घाला. हेल्मेटचा वापर, चुकीच्या मार्गिकेवरून (लेन) वाहन चालवणे, असुरक्षित 'ओव्हरटेकिंग' प्रखर एलईडी दिव्यांचा वापर, लाल-निळे दिवे, भोंगे (सायरन) यांची अनधिकृत विक्री आणि गैरवापर रोखण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. गत वर्षभरात राज्यातील विविध महामार्ग आणि राज्यमार्गावर झालेल्या ३६ हजार ८४ अपघातांमध्ये सुमारे १५ हजार ३३५ प्रवाशांना आपले प्राण गमवावे लागले तर ३० हजार ७३० प्रवासी जखमी झाले. या अपघातांवर नियंत्रण मिळविण्याचे मोठे आव्हान यंत्रणेपुढे आहे. दळणवळण मंत्रालय आणि सरकारचा आर्थिक पाहणी अहवाल तसेच रस्ता सुरक्षा समित्यांच्या निरीक्षणानुसार डिसेंबर २०२४ मध्ये मोटार वाहनांची संख्या ४.८८ कोटी तर प्रति १० हजार वाहनांमागे ७ अपघात अशी नोंदवली गेली. २०१५ मध्ये हेच प्रमाण २५ होते. २०२४ मध्ये अपघातांच्या संख्येत घट करण्यात यश आले असले तरी, अद्यापही अपघातांचे प्रमाण मोठे आहे. ते कमी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अपघात रोखण्यासाठी दरवर्षी रस्ते सुरक्षा या संकल्पनेवर आधारित पथनाट्य आणि व्याख्याने आयोजित करण्यात येतात. रस्ते सुरक्षा उपायांना प्रोत्साहन देण्यासाठी जानेवारी महिन्यात रस्ते सुरक्षा सप्ताह पाळण्यात येतो. ८० टक्के अपघात हे चालकाच्या चुकीमुळे होतात. त्यासाठी चालकांना योग्य प्रकारचे प्रशिक्षण देण्याची गरज आहे. सर्वाधिक अपघात आणि मृत्यूमागचे मुख्य कारण म्हणजे वाहनांचा अतिवेग. अतिवेगामुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटते आणि ते अपघाताला कारणीभूत ठरते. 'वेगावर नियंत्रण ठेवा' असे फलक महामार्गावर लावलेले असतात. पण या सूचनांचे पालन होताना दिसत नाही. मद्यप्राशन करून वाहन चालवल्याने वेगावर नियंत्रण रहात नाही आणि वाहनावरील नियंत्रण सुटून अपघात होतो. वाहन चालवताना थकवा किंवा झोप आल्याने अपघात झालेले दिसतात. विशेषत: ट्रक आणि लांब पल्ल्याचा अपघात होण्यामागचे हे एक प्रमुख कारण आहे. वाहन चालवताना थकवा किंवा झोप आल्याने चालकाचे मेंदूवरील नियंत्रण सुटते आणि रात्री -अपरात्री अपघात होतात. वाहन चालवताना मोबाईलच्या वापरामुळेही अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. परवाना नसलेले चालक वाहन चालवताना दिसतात, त्यामुळेही अपघातांना निमंत्रण मिळते. वाहन चालवताना ब्रेक, टायर, स्टेअरिंग, हेडलाईट सुस्थितीत आहेत की नाही हे पाहणेही अत्यंत महत्त्वाचे आहे.

वाहतूक शाखेकडून नियमित तपासणी होत नसल्याने अधिक भाड्याच्या हव्यासापोटी वाहनचालकांकडून ओव्हर लोडिंग केले जाते, अधिक प्रवासी आणि अधिक माल भरला जातो, त्यामुळेही अपघात होताना दिसतात. रात्रीच्यावेळी वाहन चालवताना खड्डे, अंधार, चुकीची वळणे यामुळेही अपघात होतात. वाहतूक नियमांचे पालन न करणे, रस्त्यावरील अनधिकृत पार्किंग, अतिक्रमण, अपुरे वाहतूक चिन्ह आदी गोष्टींमुळेही अपघातांना निमंत्रण दिले जाते. जोरदार पाऊस, धुके, वादळी वारे, पावसाळ्यात वाहने घसरूनही अपघात होतात. पादचारी, सायकलस्वारांचे चुकीच्या पद्धतीने रस्ता ओलांडणे, जनावरे, वन्यप्राणी अचानक रस्त्यावर येणे अशा प्रकारांमुळे अपघात होतात. अपघात रोखण्यासाठी आणि अतिवेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी हायवे व शहरी रस्त्यांवर स्पीड गन, कॅमेरे, ई-चलन, दारू पिऊन वाहन चालवणाऱ्यांवर कारवाई, नियमित अल्कोहल टेस्ट, हेल्मेट, सीटबेल्ट सक्ती, दंड व जनजागृती मोहिमा राबविणे अत्यावश्यक आहे. दरवर्षी वाहनांची तांत्रिक तपासणीही केली जावी. आपत्कालीन सेवा, हेल्पलाईनचा वापर करण्यासंदर्भात जनजागृती करणे, अपघातग्रस्तांना त्वरित रुग्णालयात नेणे, अपघात झाल्यास हायवे पेट्रोलिंग व्हॅनद्वारे तत्काळ मदत उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. सरकारने खड्डेमुक्त रस्ते अभियान राबविणे अत्यंत गरजेचे आहे. सुस्थितीतील रस्ते ही सरकारची जबाबदारी आहे. भ्रष्टाचार, अपुरी देखभाल आणि कमी दर्जाचे बांधकाम ही रस्ता समस्येची मुख्य कारणे आहेत.

# नायगाव ग्रामपंचायतीत अस्वच्छता; मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार

मंठा । प्रतिनिधी

**जालना जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषद मध्ये सुधारणा केली पण ग्रामपंचायत कार्यालय मध्ये सुधारणा होईल का असे बोलल्या जात आहे. फक्त जिल्हा परिषद स्वच्छता मोहीम करून जमणार नाही . तालुक्यातील नायगाव ग्रामपंचायतकडून केवळ कागदोपत्री स्वच्छता अभियान व अन्य उपक्रम राबवले जात असल्याचा गंभीर आरोप करत किसान ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष विजय देशमुख यांनी (ता. ६) रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.**



तक्रारीत म्हटले आहे की, नायगाव येथील माजी सरपंच अविनाश राठोड हे अनेक वर्षांपासून विविध योजना आणि स्वच्छता अभियान केवळ कागदोपत्रीच दाखवून बनवाबनवी करीत आहेत. ग्रामपंचायत कार्यालयातील स्वच्छतागृहात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता असून, गावातील अंतर्गत रस्ते चिखलमय स्थितीत आहेत. त्यामुळे गावात अस्वच्छ वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. दरम्यान, या संदर्भात माजी सरपंच अविनाश राठोड यांना विचारले असता त्यांनी, ''स्वच्छतागृहाची स्वच्छता तात्काळ करण्यात येईल,'' असे सांगितले.

# बळीराजाला मदतीसह, आता कर्जमुक्तीची गरज-किसनराव मोरे

मंठा । प्रतिनिधी

**अगोदरच कर्जबाजारी झालेला शेतकरी अती महापूर, अतिवृष्टीमुळे हैराण झाला आहे.राज्य सरकारने जाहीर केलेल्या अल्प पॅकेज मुळें यांमध्ये शेतकऱ्यांचे कांहीच भागात नाही.या कर्ज बाजारी शेतकऱ्यांना आता संपुर्ण शेतीवर आधारित कर्जमुक्तीची अत्यंत गरज आहे.असे काँग्रेसचे माजी जिल्हा उपाध्यक्ष किसनराव मोरे यांनी म्हटले आहे.**

मराठवाड्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टी आणि पुराचा मोठ्या प्रमाणावर फटका बसला आहे.जालना जिल्ह्यातील गोदावरी, दुधना, आणि पुर्णा नदीकाठचा शेतकरी पुर्ण भरडला आहे.यामधून शेतकरी दोन ते तीन वर्षे सावरू शकत नाही.यातच लेकीबाळीचे लग्न, मुलाबाळांचे शिक्षण आणि प्रपंच कसा करावा तसेच खरडून गेलेली शेती सुपीक कशी करावी.तोंडावर आलेली रब्बी पेरणी तर होणारच नाही.असा प्रश्न शेतकऱ्यांना भेडसावत आहे.जिल्ह्यातील अनेक शेतकरी आजही पंचनाम्यापासुन वंचित आहेत. २४तासात ६५ मिलिमीटर पावसाची मर्यादा ,फार्मर आयडची मर्यादा असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना राज्य सरकारच्या मदतीपासून वंचित राहावे लागणार असल्याने राज्य सरकारने घालून दिलेल्या सर्व मर्यादा रद्द करण्यात याव्यात आणि सढळ हाताने भरघोस मदत करावी असेही किसनराव मोरे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांनी संयुक्तरीत्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ६०हजार रुपयांची मदत जाहीर करावीत.निवडणुकीत दिलेला शब्द पाळून सरकारने शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती करावी.अशीही मागणी बाधित शेतकरी वर्गातून होत आहे.सरकारने शेतकऱ्यांना मदत देण्याच्या नावाखाली शेतकऱ्यांच्याच ऊसातून प्रती टन १५रुपये वसुल करण्याचा निर्णय घेतला आहे.हा निर्णय रद्द करण्यात यावा असेही मोरे यांनी शेवटी म्हटले आहे.



## पान ६ वरून...

### तेलगाव - माजलगाव रस्त्यावर

काट्यांमुळे गाडी चालवताना हात, पाय आणि चेहऱ्यावर ओरखडे बसतात. काही ठिकाणी काटे एवढे पुढे आले आहेत की, ते वाहनांच्या आरशांनाही लागतात, असे परिसरातील आणि नियमित प्रवास करणारे नागरिक सांगतात संतापाने सांगतात. शेतकऱ्यांना ही आता या काटेरी झुडपांचा त्रास वाढला आहे. रस्त्यालगत असलेल्या शेतांमध्ये जाण्या-येण्यासाठी सुद्धा झुडपांचा अडथळा निर्माण झाला आहे. पावसाळ्यात या झुडपांखाली साप, विंचू आणि विषारी प्राणी लपण्याची शक्यता वाढते, त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. संपूर्णपणे पाहता , तेलगाव - माजलगाव रस्त्यावरील काटेरी झुडपांचा प्रश्न हा केवळ दुर्लक्षाचा परिणाम नसून नागरिकांच्या सुरक्षेशी निगडित गंभीर मुद्दा आहे. प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन स्वच्छता मोहिम राबवावी, अशी सर्वसामान्यांची एकमुखी मागणी आहे.

------------

### राज्यपाल हरिभाऊ बागडे

ज्येष्ठ नेते शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८८ व्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार, दि.३ ऑक्टोबर पासून गेवराई शहरात श्रीमद् भागवत कथा आणि भव्य किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. भावरत्न समाधान महाराज शर्मा यांच्या मधूर वाणीतून सुरु असलेल्या भागवत कथेमुळे गेवराईचे वातावरण भक्तिमय झाले आहे. अनेक नामांकित किर्तनकारांची सेवा सप्ताहभर सुरु आहे.

**शुक्रवार दि.१० ऑक्टोबर रोजी सकाळी १० वा.**

**राजस्थानचे राज्यपाल हरीभाऊ (नाना) बागडे यांच्या हस्ते**

माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांचा अभिष्टचिंतन सोहळा समितीच्या वतीने भव्य सत्कार आयोजित करण्यात आला आहे. यावेळी श्री क्षेत्र नारायणगड संस्थानचे मठाधिपती ह.भ.प.शिवाजी महाराज, श्री क्षेत्र चाकरवाडीचे ह.भ.प. महादेव महाराज यांच्यासह साधु, संत-महंत आणि गेवराई तालुक्यातील वारकरी सांप्रदायात काम करणारे किर्तनकार, गायक, वादक यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

------------

### आदित्य दंत महाविद्यालय

डॉ. आदिती सुभाषचंद्र सारडा यांनी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करत त्यांना भविष्यात अशा स्पर्धांमध्ये अधिक संधी मिळवून देण्याचे आश्वासन दिले. ''विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता खेळाच्या मैदानातही आपली गुणवत्ता सिद्ध केल्याचे त्या म्हणाल्या. हा आत्मविश्वास त्यांना भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यास मदत करेल,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महाविद्यालयाच्या या यशाने संपूर्ण परिसरात अभिमानाची भावना निर्माण झाली असून विद्यार्थ्यांचे हे यश भविष्यातील अनेक युवा खेळाडूंना प्रेरणादायी ठरणार असल्याचेही त्या म्हणाल्या. आंतरक्षेत्रीय स्पर्धेसाठी निवड झालेले विद्यार्थी सुमेध पवार डिस्कस थ्रो, हर्षदा पवार कबड्डी, अदिती गोंजारी कबड्डी, रिद्धी मोरे उंच उडी, विविध क्रीडा प्रकारांमध्ये उल्लेखनीय यश मिळवणारे विद्यार्थी, विलास तोगरे यांनी दुसरे स्थान पटकावले. खैरनार आणि सृष्टी इंगळे यांनी १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तिसरे स्थान मिळवले. रिद्धी मोरे हिने डिस्कस थ्रोमध्ये दुसरे व गोळाफेकमध्ये तिसरे स्थान प्राप्त केले. जान्हवी माळी डिस्कस थ्रोत तिसरे स्थान. शुभम आडे ४०० मीटर धावण्यात तिसरे स्थान. साहिल पोयंकर गोळाफेकमध्ये तिसरे स्थान.

------------

### आरक्षणासाठी आत्महत्या

टोकवाडी येथील वंजारी समाजाचे आत्माराम बाबासाहेब भांगे, बीड शहरातील साळीगल्ली, पेठ बीड भागातील भावसार रंगारी समाजाचे राहुल ज्ञानेश्वर पतंगे यांनी ओबीसी आरक्षणासाठी आत्महत्या केली आहे. यामुळे त्यांच्या कुटुंबीयांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. मुलांचे शिक्षण, लग्न, कुटुंबाचा उदरनिर्वाह अशा अनेक समस्या समोर आल्या आहेत. या ओबीसी समाज बांधवांच्या कुटुंबीयांना शासनाने प्रत्येकी दहा लाख रुपयांची आर्थिक मदत करून त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरीत समाविष्ट करून घ्यावे अशी मागणी यावेळी निवेदनाद्वारे ओबीसी बांधवांच्या वतीने करण्यात आली आहे. यावेळी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत, वंजारी समाजाचे नेते माऊली सिरसाट, केशव तांदळे, समता परिषद शहराध्यक्ष निखिल शिंदे व नितीन राऊत आदींची उपस्थिती होती.

------------

### शेख बिलालसह तीन

भाषणात अंबादास दादा दानवे म्हणाले की , शिवसेना स्थापनेपासून ते आजतागायत मुस्लिम समाजाच्या विरोधात पक्ष कधीच नव्हता,व आजही नाही,साबीरभाई शेख सारख्या निष्ठावंत शिवसैनिक मावळ्याला बाळासाहेब ठाकरे साहेबांनी या महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात स्थान देऊन मुस्लिम समाजाचा गौरव केला होता.आज जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या माध्यमातून केलेला प्रवेश अभिनंदनीय आहे येणाऱ्या काळात बीड शहरासह जिल्हात शिवसेना वाढविण्यासाठी मी स्वतः लक्ष घालणार असून पुन्हा गतवैभव प्राप्त करण्यासाठी तुम्ही सर्वांनी मेहनत घ्यावी, तसेच येणाऱ्या नगर परिषद व जि.प. निवडणुकीत पक्षाला घवघवीत यश मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत असे माननीय अंबादासजी दानवे साहेब यांनी आपले मनोगत व्यक्त केले यावेळी मुकेश भैय्या घुमरे, विनोद गुंड पाटील , उपसरपंच बाळासाहेब कुटे , यांच्यासह बीड शहरातील शेकडो मुस्लिम युवक उपस्थित होते.

------------

### तेली समाजाला

तेली समाजातील नागरिकांना नगरपालिकेत प्रतिनिधित्व देण्यात यावे. तेली समाजाबद्दल स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात की, जितके साथ तेली वो भाग्यशाली या उक्तीने समाजाला प्रतिनिधित्व देण्यात यावे अशी मागणी समाजाकडून महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे जिल्हाध्यक्ष संगमेश्वर फुटके, सचिव प्रा मधुकर शिंदे व समाजातील नागरिकांनी मंत्री पंकजा मुंडे व आमदार धनंजय मुंडे साहेब यांच्याकडे करण्यात आली आहे.

------------

### अपघातात मयत झालेल्या

आर्थीक व मानसीक आधार मिळाला आहे. सदर विमा मंजुर करण्यासाठी भारतीय स्टेट बँकेचे क्षेत्रीय प्रबंधक अमीत धुळे, मुख्य प्रबंधक योगेश रेंदाळकर, सौरभ बलसारा, उपप्रबंधक निलेश कोकाटे यांनी त्यांचे स्तरावर प्रयत्न करुन सदर क्लेम मंजुर केले आहेत. तर पोलीस अधीक्षक कार्यालयातील मानव संसाधनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कापुरे, कार्यालय अधीक्षक नरसींग कासेवाड सदर प्रकरणांचा पाठपुरावा केला होता.

------------

### बीड जिल्हा पोलीसांनी

एकुण ६४४.१५२ किलोग्रॅमचा मुद्येमाल नाश करण्यात आला आहे.

मुद्येमालाचा नाश केल्या नंतर म.प्र.नि.मंडळ यांचे प्रमाणपत्र घेण्यात आले असुन अंमली पदार्थ निर्मुलन व समाजामध्ये जनजागृतीसाठी बीड पोलीस पोलीसांकडुन सातत्याने प्रभावी मोहिम राबवली जात आहे. अशा कारवायामुळे जिल्हयातील गांजा व इतर अंमली पदार्थाच्या अवैध व्यापाराला आळा बसणार आहे. व समाजाची नशा मुक्त समाजाकडे वाटचाल या उददीष्टाने पोलीस विभाग ठामपणे काम करत आहे.

वरिल संपुर्ण कार्यवाही पोलीस अधिक्षक, बीड नवनीत कॉवत साहेब यांचे मार्गदर्शनाखाली मा.अपर पोलीस अधिक्षक, बीड सचिन पांडकर , अपर पोलीस अधिक्षक, अंबाजोगाई श्रीमती चेतना तिडके मॅडम तसेच क्षेत्रीय अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ जालना श्री रविंद्र जाधव, पोलीस निरीक्षक स्थागुशा बीड शिवाजी बंटेवाड, सेलचे नोडल अधिकारी सपोनि रत्नाकर घोळवे, दहशतवाद विरोधी शाखा, बीड, पोलीस अंमलदार युनुस बागवान, राजेश नेहरकर, खमर शेख, गोविंद राख, अलीम शेख, नारायण कोरडे, अमोल ससाणे असे पोलीस विभागातील अधिकारी व अंमलदार यांनी उपस्थीत राहुन सदरची कार्यवाही पार पाडली आहे.

------------

### फार्मसी महाविद्यालयात

यावेळी आपल्या प्रास्ताविक पर मार्गदर्शनात प्राचार्य तरके यांनी समाजातील गैरसमज दूर करून एच.आय.व्ही./एड्सबाबत जागरूकता वाढविण्याचे महत्त्व सांगितले.प्रमुख वक्ते प्रदीप जिरे आणि विश्वस लवंद (प्रयोगशाळा तंत्रज्ञ) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. लवंद यांनी प्रयोगशाळा तपासणी, रक्तनमुने हाताळताना घ्यावयाची काळजी आणि सुरक्षा व नियमांचे निराकरण केले. तर जिरे यांनी एच.आय.व्ही./एड्सचे लक्षणे, संसर्गाचे मार्ग, प्रतिबंधात्मक उपाय आणि समाजातील कलंक नष्ट करण्याची गरज स्पष्ट केली. शिबिरातील प्रश्नोत्तर सत्रात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला .

------------

### श्री.तुळजाभवानी

हिंगणी, देवदहिफळ, कासारी, कोयाळ, तेलगाव ,चाटगाव, जवळा, जिवाचीवाडी,भोपा या गावातील मल्ल राज्य पातळीवर कुस्तीचा खेळ खेळत आहेत. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रतिवर्षी कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने भोपा येथे भव्य कुस्तीचा दंगलीचे आयोजन करण्यात येते. दहा रुपयांपासून पाच हजार एक रुपयांचे बक्षीस जिंकणाऱ्या मल्लास आयोजक मानधन स्वरूपात देतात. मंगळवारी आयोजित दंगलीत अनेक रोमांचकारी सामने या पाहायला मिळाले. राहुल लगड, लखन बडे, सिद्धेश्वर बडे, श्रावण खोत, बंटी लटपटे, धनराज देशमुख, ऋषिकेश मेंडके, अविनाश जाधव, सुनील बडे यांची झालेली कुस्ती विशेष रोमांचकारी होती. कुस्त्यांच्या फडातील शेवटची दंगल लखन बडे देवदहिफळ व राहुल लगड तेलगाव यांच्यात बरोबरीची सोडण्यात आली. बक्षिसाची रक्कम दोघात विभागून देण्यात आली. येथील पोलीस पाटील सत्यनारायण वाघचौरे, सरपंच अंकुश तिडके, भगवान वाघचौरे, भागवत वाघचौरे, राजेभाऊ वाघचौरे यांनी दंगलीचे नियोजन केले. पंच म्हणून शेख गफार, ननूमिया शेख, नारायण घडगे, बाबासाहेब काळदाते यांनी दंगलीत अचूक निकाल दिले. महादेव मुजमुले, हनुमान भोसले यांनी आपल्या पहाडी आवाजात केलेले सूत्रसंचालन सर्वांचे लक्ष वेधत होते. दिंद्रुड पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवत दंगलीचा कार्यक्रम शांततेत पार पडला.

------------

### जिल्हाधिकारी व पोलीस

पिंपळनेर यांनी दि.२७.०८.२०२५ रोजी इसम नामे शाम दशरथ वाघमारे वय ३४ वर्षे रा. अंथरवणपिंप्री ता.जि. बीड यांचे विरुध्द कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने जिल्हादंडाधिकारी साहेब बीड यांना सादर केला होता.

सदर प्रकरणात विवेक जॉन्सन जिल्हादंडाधिकारी बीड यांनी दिनांक ०८.१०.२०२५ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने कायद्याअंतर्गत आदेश पारीत करून सदर दोन्ही इसमास तात्काळ ताब्यात घेवून हर्सल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध्द करणे बाबत आदेश पारीत केले होते. त्यानंतर पोलीस अधिक्षक बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना संबधित पो. स्टे. प्रभारी अधिकारी व पो.नि. स्थागुशा बीड यांना दिल्या होत्या. सदर आदेशावरुन पो.नि. स्थागुशा शिवाजी बंटेवाड यांनी ताबे पोलीस अंमलदार यांचे मार्फत गोपणीय माहीतीच्या आधारे सदर इसमांना दि.०८.१०.२०२५ रोजी ताब्यात घेऊन संबधीत पो. स्टे.ला हजर केले. संबधीत पो.स्टे.ने नमूद इसमांना हार्सल कारगृह येथे दि. ०९.१०.२०२५ रोजी हजर करुन स्थानबध्द केले आहे.

------------

## पान १ वरून...

### दिवाळीआधी केंद्राकडून

उत्पादनही २४२ लाख टनांवरून ३५० लाख टनांवर नेण्याचा प्रयत्न राहील. याव्यतिरिक्त, पंतप्रधान मोदी यशस्वी शेतकरी उत्पादक कंपन्या, नैसर्गिक शेती करणारे शेतकरी आणि अन्य शेतकऱ्यांशी संवाद साधतील. या दिवशी पंतप्रधान मोदी पीएम किसान योजनेचा २१ वा हप्ता जारी करतील, अशी शक्यता व्यक्त करण्यात आली होती. पण, कृषिमंत्री चौहान यांच्या पत्रकार परिषदेनंतर, हे स्पष्ट झाले की पीएम किसान सन्मान निधी योजनेचा २१ वा हप्ता ११ ऑक्टोबर रोजी जारी होणार नाही. यामुळे ९.७ कोटी शेतकऱ्यांना २ हजार रुपये मिळण्याची प्रतीक्षा लांबली आहे.

------------

### राज्यातील सर्व शासकीय कर्मचाऱ्यांचे एक

दि. २४ सप्टेंबर २०२५ आणि २८ सप्टेंबर २०२५ रोजीच्या पत्रांवर शासनाला कळवले आहे. राज्य शासनाच्या वतीने सुरू असलेल्या सदर मदत कार्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अधिक रक्कम देता यावी या कारणास्तव राज्यातील सर्व आयएएस, आयपीएस भारतीय सेवा व राज्य शासनाचे सर्व अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधी मध्ये जमा करण्यात येणार आहे. हे वेतन ऑक्टोबर महिन्यातील वेतनातूनच एक दिवसाचा पगार अपतग्रस्तांसाठी देण्यात येणार असून, यासाठी राज्य शासनाने नियमावली निश्चित केली आहे. राज्य शासनातील सर्व कर्मचारी, नगरपालिका, महानगरपालिका, महामंडळे, शासनाचे अंगीकृत उपक्रम असलेल्या सर्वच कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीसाठी जमा केले जाणार आहे.

------------

### घुलेचा दोष मुक्तीचा

सरकार पक्षाच्या अर्जावर यापूर्वीच सुनावणी झाली आहे. गुरुवारी न्यायालयाने सुदर्शन घुले याच्या अर्जावर निर्णय देत अर्ज नामंजूर केल्याची माहिती, विशेष सहायक सरकारी वकील ॲड. बाळासाहेब कोल्हे यांनी दिली. डिसेंबर २०२४ मध्ये संतोष देशमुख यांचे अपहरण करून निघृण हत्या झाली. या प्रकरणाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या विशेष तपास पथकाने केला. यात वरील आरोपींसह कृष्णा आंधळे याच्यावर ठपका ठेवला आहे. वरील सर्व आरोपी मकोका अंतर्गत कारागृहात असून कृष्णा आंधळे फरार आहे. आता इतर आरोपींची दोषमुक्तीची मागणी आणि आरोपींच्या मालमत्ता जप्तीच्या मागणीवर न्यायालय काय निर्णय देते याकडे लक्ष लागले आहे.

------------

### योगेश कदमांची मंत्रिमंडळातून

विरोधी पक्ष म्हणून आम्ही रस्त्यावर उतरू, असा इशारा उद्धवसेनेचे आमदार अनिल परब यांनी गुरूवारी दिला आहे. अनिल परब यांनी पत्रकार परिषद घेत म्हणाले की, गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी गुंडाचा भाऊ असलेल्या व्यक्तीला अधिकृत शस्त्र परवाना दिला. पोलिसांनी हा परवाना नाकारला. पोलिसांनी त्यांचे काम चोख केले होते. परंतु योगेश कदमांनी पुणे पोलीस आयुक्तांचे आदेश रद्द केले. पुणे जिल्ह्यात आज ७० टोळ्या सक्रीय आहेत. निलेश घायवळचा भाऊ सचिन घायवळ याच्यावर खंडणी, खूनासारखे गंभीर गुन्हे आहेत. पोलिसांनी गुन्हेगारी पार्श्वभूमी पाहता सचिन घायवळ याला शस्त्र परवाना नाकारला होता, परंतु गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी पत्र लिहून हा शस्त्र परवाना मिळवून दिला. पोलिसांच्या रिपोर्टमध्ये सचिन घायवळची सगळी पार्श्वभूमी लिहिली आहे. तरीही योगेश कदमांनी कुठल्या मोबदल्यात त्याला शस्त्र परवाना मिळवून दिला? असा सवाल अनिल परब यांनी केला. तसेच पोलिसांनी शस्त्र परवाना नाकारला असताना गृह राज्यमंत्री परवाना देतात. त्यातून पोलिसांचे ध्यैर्य खच्चीकरण करण्याचं काम त्यांनी केले. दाऊद मुंबईत आला, तो दोषमुक्त झाला तर त्यालाही परवाना देणार का? डान्सबार, वाळू उपसा आणि आता हा शस्त्र परवाना प्रकरण याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहे. पोलिसांनी परवाना का नाकारला याची कारणे तपासली जातात. हा गुंड आहे. गुंडाचा भाऊ असून पुण्यात दहशत आहे. त्याच्यावर खूनाचे, खूनाचा प्रयत्न आणि खंडणीचे गुन्हे आहेत असे पोलिसांनी सांगितले. परंतु इतक्या गंभीर गुन्ह्यात अडकलेल्या गुंडांना शस्त्र परवाना देताना एकतर आर्थिक मोबदला घेतला असेल किंवा भविष्यात माझ्यासाठी तुला काहीतरी काम करावे लागेल असे सांगून हा परवाना दिला असेल, असा आरोपही अनिल परब यांनी केला. दरम्यान, निलेश घायवळ आणि सचिन घायवळ खूनाच्या प्रकरणात एकत्र होते. अशा गुंडांना तुम्ही शस्त्रे परवाने देत आहात. त्यातून तुमची सुटका होऊ शकत नाही. योगेश कदम यांनी अशाप्रकारे किती शस्त्र परवाने दिले आहेत त्याची माहिती आता घेतो आहे. अर्धन्यायिक न्यायाधीशांच्या खुर्चीत बसून तुम्ही असे शस्त्र परवाने कसे देऊ शकता? मुख्यमंत्र्यांची अशी काय मजबुरी आहे अशा मंत्र्यांना सोबत ठेवले आहे? गृह, महसूलसारखी खाती या दिवट्याला दिली आहेत. त्याठिकाणी बसून हे काय काय प्रताप करत आहेत हे दिसून येत आहे, असेही अनिल परब यांनी म्हटले आहे.

------------

### मराठा समाजाला आमच्यातून

कुणबी किंवा मराठा-कुणबी नोंदींद्वारे ओबीसी आरक्षणात शिरकाव करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांना तीव्र विरोध दर्शवणारी आहे. मराठा आरक्षणाच्या घोषणेनंतर ओबीसी समाजाच्या अस्तित्वाची ही लढाई असल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून कुणबी समाजाच्या कार्यकर्त्यांनी सरकारला थेट इशारा दिला आहे. सरकारने आमच्या आरक्षणाच्या मुद्याकडे तातडीने लक्ष देऊन आमच्या मागण्या मान्य कराव्यात, अन्यथा आजचा हा मोर्चा भविष्यात अधिक उग्र आंदोलनाचे रूप घेईल, असे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले आहे. मराठा आरक्षण आणि ओबीसींच्या नोंदींवरून निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, आजच्या या मोर्चाने राज्यातील आरक्षणाचे राजकारण निर्णायक वळणावर येऊन ठेपले आहे.

--------

### राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या

निर्वाचक गणनिहाय तसेच नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी तयार करण्यात आली आहे. या यादीतील नावे शोधण्यासाठी ह्üि://ारहरीशल.ारहरीरीहीर.सीं.ळप/ या राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावरही संबंधित लिंक उपलब्ध आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या प्रारूप मतदार यादीची छायांकित प्रत संबंधित तहसील कार्यालयात उपलब्ध असेल, तर नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या यादीची छायांकित प्रत संबंधित नगरपरिषद व नगरपंचायत कार्यालयात मिळेल.

----------

### अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या न्यायासाठी हिवाळी

चालणार आहे. सरकारने किमान तीन आठवड्यांचे अधिवेशन घेण्याची हिंमत तरी दाखवावी. तसेच, कोरोना काळात दीर्घ अधिवेशन घेण्याची मागणी करणारे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब शांत का आहेत? असाही प्रश्न त्यांनी उपस्थित केला. रोहित पवार म्हणाले की, अतिवृष्टीमुळे राज्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून, सरकारकडून दिलेली मदत अपुरी आहे. तसेच राज्यातील कायदा-सुव्यवस्था बिघडली आहे. आरक्षणाचे प्रश्न प्रलंबित असून राज्याची अर्थव्यवस्थाही कोलमडली आहे. अशा परिस्थितीत फक्त दहा दिवसांचे अधिवेशन घेणे म्हणजे हे सरकार जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत असल्याची टीका त्यांनी केली. सरकारने विहिरींसाठी फक्त २० ते ३० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे, पण ती अपुरी आहे. प्रत्येक विहिरीसाठी किमान दीड लाख रुपये दिले पाहिजेत. तसेच पूरग्रस्त ४२ हजार घरांना पंतप्रधान आवास योजनेतून थेट दीड लाख रुपयांची मदत देणार होते ती रक्कमही सरकारने द्यावी. तसेच, हे सरकार मदतीसाठीचे आकडे फुगवून दाखवत आहे तसेच हे सरकार शेतकऱ्यांना मदत करण्याऐवजी केवळ घोषणा आणि आकडेवारीच्या खेळात अडकवून ठेवत असल्याचा आरोपही केला आहे.

----------

### भ्रष्टाचारामध्ये महाराष्ट्र

सेवानिवृत्त आयपीएस अधिकारी सकारात्मक दृष्टिकोनातून पाहत आहेत. राज्यातील नागरिकांची भ्रष्टाचाराविरुद्धची भूमिका आणि पोलिस यंत्रणेवरील विश्वास अधोरेखित करते. लाचखोरी सामान्य झालेली नसून, नागरिक निर्भीडपणे तक्रारी दाखल करतात, ही बाब स्वागतार्ह असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. महाराष्ट्रात सर्वाधिक कारवाया नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आल्या, तर सर्वांत कमी कारवाया मुंबईत नोंद आहेत.

----------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार दि. १० ऑक्टोबर २०२५



## थोडक्यात...

### कवी सय्यद अल्लाउद्दीन यांची कोजागिरी लखनऊमध्ये

आष्टी । प्रतिनिधी

तुम्हारे शहर में मय्यत को सब कंधा नही देते.... हमारे गाव मे छप्पर भी सब मिलकर उठाते है.... उत्तर प्रदेशातील लखनऊ शहराला उर्दू, हिंदी मिश्रित भाषेने नवाबी आणि नजाकतींनी भरलेला लहजा दिला. उर्दू साहित्य अकादमीचे ख्यातनाम कवी मुनव्वर राना यांच्या अनेक वर्षाच्या वास्तव्याचे शहर म्हणून लखनऊची ओळख आहे.याच लखनऊ शहरातील सँवी ग्रँड हॉटेलच्या सभागृहात दिनांक ०६ ऑक्टोबर २०२५ रोजी कोजागिरी पौर्णिमेच्या रात्री आष्टी,जि.बीड येथील कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन यांच्या मराठी कवितेची मैफिल रंगली.एका अर्थाने उर्दू गझलच्या दुधात मराठी कवितेचं चांदणं चमचमून गेलं.त्यांनी यावेळी हास्य विनोदाचे फवारे,कविते मागच्या गोष्टी सांगून,मोजक्या कवितांचे वाचन,गायन करून कोजागिरी पौर्णिमेच्या चांदण्याचा गोडवा अधिक गोड केला.डॉ.अरगडे यांच्या उपस्थितीत गुप्ताजी यांचे आयोजन,नियोजन दुधात साखर टाकणारेच होते.यावेळी डॉ.सय्यद हुमायुद्दीन,डॉ.सय्यद वलीयुद्दीन सह अनेक रसिक स्रोते उपस्थित होते.

### दिव्यांगाना सोयी, सुविधा पुरविण्यासाठी जिल्हा परिषदेत आज बैठकीचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

दिव्यांग कल्याण विभागाच्या वतीने दिव्यांगाच्या सोयी- सुविधांसाठी सुगम्य करावयाच्या बाबींच्या आढावा घेऊन सदरील माहिती सादर करण्याच्या सूचना दिव्यांग कल्याण विभागाच्या सचिवांनी दिल्या आहेत. त्याअनुषंगाने बीड जिल्हा परिषदेच्या विभागप्रमुखांच्या बैठकीचे दिनांक १० ऑक्टोबर रोजी सकाळी १०.०० वाजता आयोजन करण्यात आले आहे.दिव्यांग कल्याण विभाग, सचिवांनी दिनांक ११ सप्टेंबर २०२५ रोजी बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार माहिती सादर करण्याच्या सूचना दिल्या आहे. कार्यालय प्रमुखांच्या अधिनस्त सार्वजनिक ठिकाणे, माहिती आणि संवाद तंत्रज्ञान, संकेतस्थळे, वाहतूक, वाहन तळ जागा व इतर अनुषंगीक सोयी-सुविधा दिव्यांगांना सुगम्य करण्याच्या अनुषंगाने संदभीय पत्राद्वारे व स्मरणपत्राद्वारे माहिती सादर करण्यात येणार आहे बाबत आपणास कळविण्यात आले होते. . बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार दि.१० ऑक्टेंबर रोजी सकाळी १०.०० वाजता बीड जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव यांच्या अध्यक्षस्थानी सदर बैठक होणार आहे.

### गेवराई शहरातील भैय्या साहेबांचे हे दोन शिलेदार उतरणार निवडणुकीत

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई नगरपालिकेच्या निवडणुका आता तोंडावर आले आहेत गेवराई शहरातील माजी आमदार अमरसिंह पंडित आणि आमदार विजयराजे पंडित यांचे सच्चे शिलेदार शेख बाबा व मोहसीन बागवान ही दोघेही नगरपालिका निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत.



शेख बाबा आणि मोहसीन बागवान ही जोडगोळी गेवराई शहरातील विविध सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर असते प्रामुख्याने अमरसिंह पंडित यांचे विश्वास म्हणून त्यांची ओळख आहे अनेक सामाजिक राजकीय आणि धार्मिक कार्यामध्ये अग्रेसर राहून विजयसिंह पंडित आणि अमरजी पंडित यांचे हात बळकट करण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असतात त्यांचा शहरातील जनसंपर्क पाहता जनतेने त्यांनी निवडणूक लढवावी असा आग्रह होत असल्याने हे दोघेही आगामी नगरपालिका निवडणुकीमध्ये उतरवणार आहेत अमरसिंह पंडित यांनी होकार दिला तर निवडणुकीत उतरणार असल्याचे देखील शेख बाबा आणि बाबांनी चर्चेदरम्यान बोलताना स्पष्ट केले आहे

### सुदामा कृष्ण भेटीने भागवत कथेचा झाला समारोप

गेवराई । प्रतिनिधी

माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८८ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित भागवत कथेचा समारोप कृष्ण सुदामा च्या भेटीने करण्यात आला. यावेळी भागवताचार्य समाधान महाराज शर्मा यांनी आपल्या सुश्राव्य वाणीतून भागवत कथेची सांगता केली. यावेळी त्यांनी सुदामा कृष्ण भेट कथन केली त्यावेळेस उपस्थितांच्या डोळ्यात अश्रू उभा राहिले. याप्रसंगी माजी मंत्री शिवाजीराव पंडित, आ. विजयसिंह पंडित, युवानेते पृथ्वीराज पंडित यांच्यासहहभाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त समाधान समाधान महाराज शर्मा यांच्या भागवत कथेचा समारोप झाला. यावेळी गेवराई शहरासह ग्रामीण भागातून भाविक भक्तांनी प्रचंड गर्दी केली होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभिष्टचिंतन सोहळा समितीने परिश्रम घेतले.

# घरकुल कर्मचाऱ्यांच्या विरोधात पंचायत समिती समोर अखंड हरिनाम सप्ताह

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाटोदा पंचायत समिती येथील घरकुल विभागाचे कर्मचारी बेकायदेशीररित्या घरकुलांचे हप्ते देत आहेत. परंतु ज्यांची घरकुल बांधून पूर्ण झाली आहेत त्यांना बेसमेंटचे फोटो दाखवा मला का नाही सांगितले अशी कारणे देवून त्यांना घरकुलांचे बिलापासून जाणीवपूर्वक बाजूला ठेवले जात आहे. या कारणांमुळे चुंबळी ग्रामस्थांच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताह आंदोलन करण्यात येत आहे.**

मौजे चुबळी या गावात अनेक ग्रामस्थांना घरकुल मंजूर होऊन बेसमेट काम करुन सुध्दा बील काढले जात नाही आणि जे घरकुलांचे हप्ते सोडले आहेत त्यांचे कोणाचेही बेसमेट जिओटकचे फोटो आपले कार्यालयकडे नाहीत तसेच ते संपुर्ण आपले कार्यालयाणे जाणीवपूर्वक काही कर्मचारी यांना चुंबळी येथील घरकुलांचे हप्ते देवू नका असे कळविले समजते. पुढे आंदोलकाने



निवेदनामध्ये नमूद केले आहे की आमचे त्वरीत चुंबळी येथील सर्व घरकुलांचे दुसऱ्या हप्त्याचे वितरण करावे व दोषी कर्मचारी यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांचे निलंबन करण्यासाठी आज गुरुवार दि. ९ आक्टोंबर २०२५ रोजी चुंबळी ग्रामस्थांच्या वतीने आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात गोरख झेंड, अविनाश नागरगोजे, नरहरी पवळ, भरत नागरगोजे,दत्तु पवळ, दिनकर नागरगोजे, का. महादेव नागरगोजे, मोहन पवळ, महादेव नागरगोजे, शिवाजी पव्हणे, विशाल मळेकर, सतिश सिरसाठ, सह आदी उपस्थित होते.

उपरोक्त संदर्भिय पत्रकान्वये घरकुलाचे हप्ते सोडणे विषयी आपण आज दिनांक ०९/१०/२०२५ रोजी पंचायत समिती पाटोदा कार्यालया समोर अंखड हरिनाम सप्ताहाचे अंदोलन करित अहात. आपणास विनंती करण्यात येते की, सदरील घरकुलाचे हप्ते दिनांक १४/१०/२०२५ रोजी नंतर मा.गविअ यांच्या सुचने नुसार घरकुलाचे हप्ते सोडणे बाबत कार्यवाही करण्यात येईल. सदर पंचायत समिती पाटोदा कार्यालया समोरील अंखड हरिनामाचे सप्ताहाचे आयोजन स्थगोत करण्यात यावे ही विनंती.

गट विकास अधिकारी वर्ग-१ पंचायत समिती पाटोदा

## अमोलक संस्थेमध्ये कायदेविषयक जनजागृती शिबिर

आष्टी। प्रतिनिधी

तालुक्यातील कडा येथिल गांधी महाविद्यालयामध्ये श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ कडा, तालुका विधी सेवा समिती आष्टी व विधीज्ञ संघ आष्टी यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्धाटन मान्यवरांच्या हस्ते श्री अमोलक ऋषिजी म. सा. व सरस्वती देवी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून आष्टी न्यायालयाचे प्रमुख दिवाणी न्यायाधीश के. के. खोमणे, सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती पी. जी. इनामदार मॅडम, दुसरे सह दिवानी न्यायाधीश श्री. एम. आर. बडाख, आष्टी पोलीस स्टेशनचे पी एस आय एस. डी. शिंदे, फिरते विधी सेवा केंद्र व लोक अदालत मोबाईल व्हॅनचे वाहन चालक हरिदास जगदाळे, नितिन उन्हाळे,आष्टी वकील संघाचे अध्यक्ष अजय जेवे, जेष्ठ विधीज्ञ ॲड. बाबुराव अनारसे, ॲड राकेश हंबर्डे,ॲड.अविनाश निंबाळकर, व वकील संघाचे कार्यकारिणी सदस्य



उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ कडाचे विश्वस्त अध्यक्ष गोकुळदास मेहेर हे होते. तसेच व्यासपीठावर संस्थेचे विश्वस्त उपाध्यक्ष बाबुलाल भंडारी, संस्थेचे प्रधानमंत्री हेमंतकुमार पोखरणा, मानदमंत्री डॉ. महेंद्रकुमार पटवा, कोषाध्यक्ष डॉ. उमेशकुमार गांधी, उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अजय जोशी यांनी करत असताना बालक संरक्षणविषयक कायद्याची माहिती दिली, संस्थेचे विश्वस्त उपाध्यक्ष बाबुलाल भंडारी यांनी अमोलक संस्थेविषयी माहिती देऊन विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये कायदेविषयक ज्ञान जाणून घेण्याची आवश्यकता विशद केली. आष्टी पोलीस स्टेशनचे पी एस आय एस. डी. शिंदे यांनी सायबर क्राईम व मोबाईल वापरताना विद्यार्थ्यांनी घ्यावयाची काळजी याविषयी मार्गदर्शन केले. सह दिवाणी न्यायाधीश एम. आर. बडाख यांनी महिलाविषयक कायद्याविषयी मार्गदर्शन करताना विशाखा मार्गदर्शक तत्वे याबद्दल माहिती देऊन विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण केली. न्यायमूर्ती श्रीमती पी. जी. इनामदार मॅडम यांनी मानसिक आरोग्याबद्दल विद्यार्थ्यांनी घ्यावयाची काळजी व याविषयी असणारे संरक्षक कायदे याची माहिती दिली.

दिवाणी न्यायाधीश के. के. खोमणे यांनी विविध कायदेविषयक मार्गदर्शन करताना अमली पदार्थांचे मानवी जीवनावर होणारे दुष्परिणाम याविषयी कायद्याच्या दृष्टिकोनातून प्रकाश टाकला. संस्थेचे मानदमंत्री डॉ. महेंद्रकुमार पटवा यांनी समारोप करताना महाविद्यालयीन जीवनात युवकांसमोर असणारे आवाहने स्पष्ट केले तसेच विद्यार्थिनींनी शिक्षण घेत असताना निडर होऊन आव्हानांना सामोरे जाणे व कायदेविषयक माहिती संपादन करणे आवश्यक असल्याचे सांगितले. यावेळी सर्व मान्यवरांच्या हस्ते गांधी महाविद्यालयामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. तसेच चंदनमल भळगट प्राथमिक विभागातील मंथन परीक्षेमध्ये विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. शतक महोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या अमोलक संस्थेचे शैक्षणिक व सामाजिक कार्याची प्रमुख दिवाणी न्यायाधीश के. के. खोमणे व इतर मान्यवरांनी दखल घेऊन समाधान व्यक्त केले. याप्रसंगी गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जवाहरलाल भंडारी, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा. नवनाथ पडोळे, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. गफार सय्यद, गुंदेचा मॅडम, मोतीलाल कोठारी विद्यालयाचे मुख्याध्यापक मथाजी शिकारे , प्रा. धनंजय कोकणे व प्रा. अजीत गुगळे पत्रकार, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. शेख यांनी केले.

## सायबर फ्रॉडमध्ये अडकलेले पैसे ॲड.आदर्श जाधव यांच्या प्रयत्नाने व न्यायालयाच्या आदेशाने परत

बीड । प्रतिनिधी

सायबर फसवणुकीच्या प्रकरणात अडकलेले पैसे डव्होकेट आदर्श जाधव (जिल्हा व सत्र न्यायालय, बीड) यांच्या कायदेशीर प्रयत्नांमुळे आणि न्यायालयाच्या आदेशाने तक्रारदारास परत मिळाले आहेत. या प्रकरणात भारतीय न्याय संहिता (इछडड कलम ५०३) अंतर्गत आवश्यक नोंद घेऊन कार्यवाही करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, एका नागरिकाच्या बँक खात्यातून ऑनलाईन फसवणुकीद्वारे काही रक्कम कपात झाली होती. तक्रार प्राप्त झाल्यानंतर ड. जाधव यांनी सायबर पोलिस ठाणे, बँक अधिकारी आणि पेमेंट गेटवे संस्थांशी समन्वय साधून संपूर्ण प्रक्रिया कायदेशीर मार्गाने पुढे नेली. यानंतर त्यांनी हे प्रकरण न्यायालयात दाखल करून, सादर केलेल्या कागदपत्रांवरून न्यायालयाकडून आदेश प्राप्त केला. त्या आदेशानुसार गोठवलेली रक्कम



अधिकृतपणे तक्रारदाराच्या खात्यात परत करण्यात आली. या संपूर्ण कार्यवाहीदरम्यान ड. आदर्श जाधव यांना ड. अशोक मुंढे तसेच ड. तुषार विधाते यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या सहकार्यामुळे ही कायदेशीर प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण होऊ शकली. या प्रयत्नामुळे तक्रारदारास न्याय मिळाला असून, स्थानिक नागरिक तसेच न्याय क्षेत्रातून तिघाही डव्होकेट्सच्या कार्याचे मोठे कौतुक होत आहे. सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर ड. आदर्श जाधव यांनी जनतेस आवाहन केले आहे की, ऑनलाईन व्यवहार करताना पूर्ण सावधगिरी बाळगा, आणि फसवणुकीचा प्रसंग उद्भवल्यास तत्काळ सायबर पोलिस तसेच डव्होकेटचा सल्ला घ्या.

## अटीट्यूट जर्नीचा पहिला उमरा टूर मक्का-मदिनासाठी रवाना

बीड । प्रतिनिधी

अटीट्युट जर्नी ता. आष्टी जिल्हा बीड महाराष्ट्र येथून भारत देशात व देशा बाहेरील एक डझन भर देशातून सुरु करण्यात आली असून टूर सर्व धार्मिक स्थळे मक्का-मदिना बरोबर इतर ऐतिहासिक व प्रेक्षनीय स्थळाची विझिट-दर्शन संपूर्ण माहितीसह प्रवाशांना विजा, विमान तिकीट, हॉटेल बुकिंग, बस-टेक्सी सेवा पुरवणे, देशी खाद्य सेवा उपलब्ध करून देते. सदर टूर सेवा बीड जिल्हातील नागरिका बरोबर महाराष्ट्रतील नागरिकांना मोफत दारात एक विश्वनीय देणायचा प्रयत्न करत आहे.

बीड जिल्हतील पाहिली टूर पथक माका-मदिना साठी मा.मिर्झा उबेद बेग संचालक व मा. मिर्झा शाहनवाज बेग मुख्य संचालक यांनी शेकडो च्या साक्षीने हिरवी झेंडी दाखून रवाना केली. यावेळी



मा. मिर्झा नियामत बेग मा. शिक्षण सभापती जिल्हा परिषद बीड, मा. अडो शेख शफिक भाऊ ए,आई,एम,आई एम बीड,हज कमेटी बीड चे संचालक काजीं नजीब,जिल्हा वक्फ ऑफिस शेख शोएब,शिक्षक नेते, रशीद खान, शेख मुसा,पेन्शनर संघटनेचे अध्येक्ष वजिर शेख, इंजिनिअर सय्यद मुजाहेद, शेख रशीद सर,व्यापारी-मजूर संघटनेचे शेख मुस्ताक, शेख कदीर उस्ताद, शेख राजू पटेल, सिकंदर पटेल,शेख मतीन,काजीं मुशाहेंद,शेख मंजूर सर, पठाण नईम खान,अलीम मोमीन, मोहंमद इसहाक, मोमीन करीम,सिद्दीकी बशीर,सय्यद अवेजअली, शेख मुद्दशीर, शेख अय्याज, शेख रज्जाक यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. या वेळेस उपस्थित ग्राहक -प्रवाशांना टूर चे मुख्य संचालक मिर्झा शानवाज बेग यांनी एक विश्वासार्य सेवा देणाचा संकल्प केलाअसून टूर चे मुख्य कार्यालय बशीर गंज येथे सेवेसाठी सुरु केले आहे.

## भुषण गवई यांच्यावरील हल्ल्याच्या निषेधार्थ संविधान प्रेमींकडून आज परळीत निदर्शने

**परळी । प्रतिनिधी**

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्यावर बूट फेक करणाऱ्या देशद्रोही वकील राकेश किशोर या वकिलावर गुन्हा दाखल करावा व या घटनेच्या निषेधार्थ परळी शहरात आज संविधान प्रेमी नागरिकांकडून तीव्र निदर्शने करण्यात येणार आहेत.

भारतीय संविधान आणि लोकशाही मजबूत करण्यासाठी या देशातील न्याय व्यवस्था सर्वात महत्वाचा घटक आहे.देशात कायद्याची अंमलबजावणी होते किंवा नाही,शासन - प्रशासन भारतीय संविधानानुसार काम करत आहे की नाही यावर लक्ष ठेवण्याचे काम सर्वोच्च न्यायालय करीत असते.धर्मानिरपेक्षक्ष संविधान हे लोकशाहीचा आत्मा आहे.आणि देशातील या सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश बी.आर. गवई यांच्यावर एका सनातनी देशद्रोही



वकिलाने बुट फेकून हल्ला केला आहे. हा हल्ला या देशाच्या न्यायव्यवस्थेवर आणि लोकशाहीवर झालेला आहे. ही घटना अत्यंत गंभीर आणि देशद्रोहाचा गुन्ह्यासारखीच आहे.

या हल्लेखोर राकेश किशोर वकिलावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा व त्याला केंद्र सरकारने अटक करावी या मागणीसाठी आज दिनांक ९ ऑक्टोबर रोजी राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक येथे सकाळी ११ वाजता तमाम संविधान प्रेमी नागरिकांकडून तीव्र निदर्शने करण्यात येणार आहेत. या निदर्शनात शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## माजलगाव तालुक्यातील पुरग्रस्थांना श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचा मदतीचा हात

माजलगाव । प्रतिनिधी

नवरात्रौत्सवात बीड जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे गोदावरी व सिंधफणा नदीच्या काठावर असलेल्या गावांना पुराचा तडाखा मोठ्या प्रमाणात बसला अनेक कुटुंबांची आर्थिक स्वरूपात नुकसान झाले. अशावेळी अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर येथील पिठाधीश परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या आशीर्वादाने व मार्गदर्शनाने गुरुपुत्र नितीन भाऊ मोरे यांच्या उपस्थितीत माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी, मंजरथ , देपेगाव , सांडस चिंचोली, आळसेवाडी, गंगामसला येथील पुरग्रस्थांना किराणा किट्स, साड्या, ब्लँकेट इतर जीवनावश्यक वस्तू देऊन मदत करण्यात आली या स्तुत्य व समाजोपयोगी उपक्रमांमध्ये इंडियन मेडिकल असोसिएशन, रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रल तसेच बीड जिल्हा





मराठी पत्रकार संघानेही आपले योगदान दिले. यावेळी मंडळ अधिकारी सोपान सोनवणे,इंडियन मेडिकल असोसिएशनचे डॉ शामसुंदर काकाणी, डॉ शिवाजीराव काकडे,डॉ यशवंत राजेभोसले,डॉ अशोक घुबडे,डॉ अभिजित सोळंके, डॉ रंगनाथ गोळेकर, डॉ पाटील,रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रल चे पांडुरंग चांडक, मराठी पत्रकार संघाचे हरिष यादव, पांडुरंग उगले, धनंजय माने, सुहास सावंत तसेच सर्व पत्रकार बांधव, माजलगाव तालुक्यातील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रातील सेवेकरी उपस्थित होते.

## माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या पथनाट्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

**माजलगाव । प्रतिनिधी**

**युनोने १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष जाहीर केले. त्यानंतरची दहा वर्षे महिला दशक म्हणून जाहीर झाले. यावर्षी (२०२५) या घटनेस ५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदने महाराष्ट्रातील महिलांच्या परिस्थितीचा आढावा घेऊन अनेक उपक्रम हाती घेतले. त्यापैकी एक सार्वजनिक वाहन स्थानकांवर महिला किती सुरक्षित आहेत त्याचा लेखाजोखा. या अनुषंगाने संपूर्ण महाराष्ट्राभर एस टी बस स्थानके व रेल्वे स्थानकांचे सेफ्टी ऑडीट करण्यात आले.**

माजलगाव विकास प्रतिष्ठानने माजलगाव व तेलगाव या बस स्थानकांचे नुकतेच सेफ्टी ऑडीट केले. या ऑडिट दरम्यान मिळालेले अनुभव आणि निरीक्षणे यांच्या आधारे सुरक्षितता आणि मूलभूत हक्क या महत्त्वाच्या विषयावर



आधारित पथनाट्याची निर्मिती करण्यात आली. या नाट्य प्रयोगाद्वारे सार्वजनिक ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आणि प्रत्येक नागरिकाचे मूलभूत हक्क यांविषयी जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला. नवरात्र महोत्सवात स्त्रियांचा सहभाग लक्षणीय असतो. त्या निमित्ताने हे पथनाट्य वेगवेगळ्या ठिकाणी सादर करण्यात आले.

यामागे सामाजिक जागृतीचा संदेश देण्याचा उद्देश या कार्यक्रमामागे होता. सुरक्षितता ही केवळ शासकीय यंत्रणांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, हा संदेश या नाट्याद्वारे प्रभावीपणे मांडण्यात आला.या पथनाट्य सादरीकरणात सिंदफणा पब्लिक स्कूल चे सांस्कृतिक विभाग प्रमुख सखाराम जोशी यांच्यासह अनेक शिक्षकांनी सक्रिय सहभाग घेतला. प्रवीण मडके, कृष्णा नवले, वरुणराज तौर, प्रवीण तिवारी, मलिक शेख,ज्योती जोशी, अर्चना जाधव, अश्विनी सोळंके या शिक्षकांनी आणि इयत्ता आठवीचा विद्यार्थी उसेद शेख तसेच मीना कदम या शिक्षकेतर कर्मचारी यांनी नाट्याला प्रभावी स्वरूप दिले. शिक्षकांच्या या सक्रिय सहभागामुळे सामाजिक जबाबदारीच्या संदेशाला अधिक वजन मिळाले. बस स्थानकासारख्या सार्वजनिक ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आजही ज्वलंत आहे. या पथनाट्याद्वारे सार्वजनिक ठिकाणांवरील मूलभूत सुविधा, सुरक्षा व्यवस्था आणि नागरिकांच्या हक्कांबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला. महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद आणि माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. भविष्यातही अशाच जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## वकील बांधवासाठी स्वरक्षण कायदा पारित करण्यात यावा-आष्टी वकील संघाची मागणी

**आष्टी । प्रतिनिधी**

महाराष्ट्रा मध्ये वकील बांधवासाठी स्वरक्षण कायदा पारित करण्यात यावा, तसेच ज्या वकील बांधवावर जीव घेणा हल्ला झाला अशा वकील बांधवाना न्याय मिळण्यासाठी महाराष्ट्र शासनाने निपक्ष पणे चौकशी करून आरोपीना शिक्षेची तरतूद करावी. या मागणी साठी आष्टी वकील संघाच्या वतीने आष्टी तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. या बाबत सविस्तर वृत्त असे की महाराष्ट्रा मध्ये वकील बांधवासाठी स्वरक्षण कायदा पारित करण्यात यावा, तसेच ज्या वकील बांधवावर जीव घेणा हल्ला झाला अशा वकील बांधवाना न्याय मिळण्यासाठी महाराष्ट्र शासनाने निपक्ष पणे चौकशी करून आरोपीना शिक्षेची तरतूद करावी. महाराष्ट्रा



मध्ये वकील बांधवावर हल्ला करण्याचे प्रमाण वाढलेले आहे.त्यामुळे वकील बांधवाना स्वतंत्र स्वरक्षण कायदा करणे बाबत महाराष्ट्र शासनाने दखल घेऊन त्वरित अमलात आणावा.अशी मागणी वकील संघाच्या वतीने आष्टी तहसीलदार यांना निवेदन देऊन केली आहे. तसेच सन्माननीय आमदार सत्यजित तांबे यांनी विधान परिषद मध्ये वकील स्वरक्षण कायद्या बाबत सडेतोड पणे आवाज उठवला. त्याबद्दल आष्टी वकील संघाच्या वतीने आष्टी वकील संघांचे उपाध्यक्ष ॲड किशोर निकाळजे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. त्या बैठकीमध्ये ॲड अजिनाथ पोकळे यांनी आमदार सत्यजित तांबे यांचा अभिनंदनचा ठराव मांडला, त्याला ॲड अजय जोशी अनुमोदन दिले. आष्टी वकील संघाच्या वतीने आमदार सत्यजित तांबे यांचा अभिनंदन चा ठराव संमत करण्यात आला.या कार्यक्रमाला आष्टी वकील संघांचे उपाध्यक्ष ॲड किशोर निकाळजे, सचिव ॲड यासिर सय्यद,ॲड. एम. एस. तांदळे,ॲड अविनाश निंबाळकर,ॲड पारखे,ॲड डी. एस. ससाणे, ॲड बाप्पुसाहेब गर्जे, ॲड शेख रियाज, ॲड सतीश गायकवाड, ॲड राजू निकाळजे, ॲड संभाजी दहातोंडे, ॲड उद्धव पोकळे, ॲड धुमाळ, ॲड सचिन चव्हाण, ॲड आबासाहेब आजबे, ॲड डोरले, ॲड विजय ढोबळे, ॲड भोकरे, ॲड चौधरी,ॲड अजीज, ॲड डी. सी. शेख इत्यादी विधिज्ञ उपस्थित होते.

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शुक्रवार दि.१० ऑक्टोबर २०२५
४

# शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाईसह कर्जमुक्त करा !

## संभाजीनगरमध्ये शिवसेनेच्या ठाकरे गटाचे शेतकऱ्यांना सोबत घेत जिल्हाधिकारी यांच्यासमोर आंदोलन

संभाजीनगर। प्रतिनिधी

शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष संभाजीनगरच्यावतीने संभाजीनगर मधील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली. शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई, सरसकट संपूर्ण कर्जमुक्ती, पीक विम्याचे निकष पूर्ववत करावे आणि घरे व पशुधनासाठी निकष शिथिल करून मदत करावी, अशी मागणी यामधून करण्यात आली.

यावेळी जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले. त्यानुसार सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टीचे महाप्रलयकारी संकट संभाजीनगर जिल्ह्यातील शेतकरी बांधवांच्या माथ्यावर कोसळले. शेतकऱ्यांच्या डोळ्यांदेखत शेती वाहून गेली, उभी पिके सडली आणि होत्याचे नव्हते झाले. ही नैसर्गिक आपत्ती असली तरी, या संकटाच्या वेळी राज्य शासनाची उदासीनता आणि प्रशासनाचा दुर्लक्षपणा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारा ठरलेला आहे.अतिवृष्टीने संपूर्ण संभाजीनगर छत्रपती



जिल्ह्यातील शेती पूर्णतः उद्ध्वस्त झाली आहे. मात्र राज्य सरकार अजूनही कागदी घोडे नाचवत असून तुटपुंजी मदत जाहीर करून शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. जिल्ह्यांमध्ये २ लाख ३६ हजार ५२८ हेक्टरहून अधिक क्षेत्रातील बागायती, जिरायती व फळ पिकाची शेती पूर्णतः नष्ट झाली आहे.५८७ गावे तर २ लाख ६२ हजार ८४० शेतकरी बांधव या आपत्तीने बाधित झाले आहेत.

लहान मोठे पकडून २०० पेक्षा अधिक दुधाळ व ओढ काम करणारे जनावरे वाहून गेल्याने दगावली आहेत.अशा परिस्थितीत राज्य सरकारने संपूर्ण महाराष्ट्रासाठी ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे नुकसान भरपाई पॅकेज जाहीर केले आहे. एकट्या संभाजीनगर जिल्ह्यात लाखो कोटींचे नुकसान झालेले असताना जाहीर पॅकेज अत्यंत तुटपुंजे आहे. या पॅकेजच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मुबलक मदत तर मिळणार नाही, तर शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली गेल्याचा आरोप शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून करण्यात आला.

या निदर्शनात शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, सहसंपर्क प्रमुख विजयराव साळवे, राजू वैद्य, राजेंद्र राठोड, नानासाहेब पळसकर, सुनीता आऊलवार, आशा दातार, बाळासाहेब थोरात, ज्ञानेश्वर डांगे, शंकर ठोंबरे, आनंद भालेकर, विष्णू जाधव यांच्यासह शेकडो शिवसैनिक सहभागी झाले होते.

# रब्बीत सापळा पिकांतून करा कीड-रोग नियंत्रण




राज्यात काही भागात रब्बीच्या पेरण्यांना सुरुवात होत आहे. पिकांवर थोड्याच दिवसात कीड रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता होत असते. मात्र या कीड रोगांच्या नियंत्रणासाठी शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही वाढतो. यावर सापळा पिके हा स्वस्त, पर्यावरणपुरक आणि प्रभावी ठरतो. सापळा पिकांची लागवड सुद्धा पिकांच्या बरोबरीने केल्यास फायदेशीर ठरते. सापळा पिके म्हणजे अशी पिके जी मुख्य पिकापासून कीड किंवा रोगांना दूर ठेवण्यासाठी लावली जातात. ही पिके कीटकांना आकर्षित करुन त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम करतात. सोप्या भाषेत सापळा पिके अशी पिके असतात जी किटकांना मुख्य पिकाऐवजी स्वत:कडे खेचून घेतात आणि त्यामुळे मुख्य पिकाचे नुकसान कमी होते.

सापळा पिकांचे फायदे : सापळा पिके किटकांना आकर्षित करतात त्यामुळे कीड नियंत्रणासाठी त्याचा वापर होतो. तसेच काही सापळा पिके मित्र कीटकांनाही आकर्षित करतात त्यामुळे शेतात मित्रकीटकांचा संचार वाढतो. याच्या वापरामुळे रासायनिक कीटकनाशकांचा वापर कमी होतो. कीडनियंत्रणाची ही एक पर्यावरणपूरक आणि स्वस्त पद्धत आहे. यामुळे मुख्य पिकाचे संरक्षण होते आणि कीटक नियंत्रणामुळे मुख्य पिकाचे उत्पादन वाढते परिणामी नफाही वाढतो.

विविध सापळा पिके : कीटक फुलांना आणि रंगांना आकर्षित होतात त्यामुळे विविध रंगांची सुगंधाची पिके सापळा पिके म्हणून वापरली जातात. त्यात झेंडू, तूर, गाजर, मोहरी, आणि मका या पिकांचा समावेश होतो.


झेंडू- हे सापळा पीक माव व इतर किडींना पिकांपासून दूर हाकलतो व सूत्रकृमींचे नियंत्रण करतो. तसेच मधमाश्यांना व मित्र किडींना मोठ्या प्रमाणात आकर्षित करतो आणि परागीभवनाची क्रिया वाढवितो. तूर- तूर हे उपयुक्त मित्रकिडींचे व परजीवी कीटकांचे आवडते निवासस्थान आहे. याच्यामुळे शेतामध्ये मित्र किटकांची संख्या वाढते. गाजर- गाजराची फुले मधमाश्या व परजीवी मित्र किटकांना आणि इतर मित्र किटकांना आकर्षित करतात. मोहरी- मोहरी हे मावा व किडींना आकर्षित करुन मुख्य पिकांचे किडींपासून संरक्षण करते. हे सापळा पीक सूर्यफूल, करडई, कोबी, फुलकोबी, मिरची, भाजीपाला व फळझाडांना नुकसान करणाऱ्या अनेक हानीकारक किडींना आकर्षित करते. मका- मका हे अनेक मित्र कीटक व परजीवी उपयुक्त किटकांचे आवडते निवासस्थान आहे. तसेच मका पक्षी थांबा म्हणूनही काम करते जसे, पक्षी मका पिकावर बसून पिकांवरील अळ्या वेचून खातात.

# पीळ रोग कांदा पिकावरील सर्वात धोकादायक रोग; लक्षणे व उपाय !

राज्यात मोठ्या प्रमाणात कांदा उत्पादन घेतले जाते. कांदा पिकाचे उत्पादन घेताना शेतकऱ्यांना अनेक औषध फवारण्या कराव्या लागतात. मात्र, कांदा पिकावरील रोग नियंत्रण करण्यात शेतकऱ्यांना अपेक्षित यश मिळत नाही. कांद्यावरील सर्व रोगांमध्ये पीळ रोग हा सर्वात धोकादायक रोग मानला जातो. कांदा लागवडीनंतरच्या पहिल्या टप्प्यात हा रोग आढळून येतो. ज्यामुळे लागवडीनंतर ऐन कांदा रोप पीक अवस्थेत पदार्पण करत असताना, कांद्यावर हा रोग दिसून येतो. परिणामी, एकरी उत्पादनात मोठी घट होण्यास हा रोग कारणीभूत ठरतो.

तिन्ही हंगामात कांदा लागवड : कांदा हे राज्यातील महत्त्वाचे पीक आहे. याशिवाय देशातील अनेक राज्यांमध्ये कांद्याचे उत्पादन घेतले जाते. प्रामुख्याने वर्षातून तीन वेळा कांदा लागवड केली जाते. कांदा हा शाकाहारी आणि मांसाहारी दोन्ही पदार्थांमध्ये वापरला जातो. कांद्यामध्ये अनेक पौष्टिक आणि औषधी गुणधर्म देखील आढळतात. त्यामुळे त्याची मागणी कायम आहे. उत्पादन थोडे कमी झाले की भाव वाढतात मात्र, गेल्या दोन ते तीन वर्षांपासून प्रतिकूल हवामान आणि योग्य भाव न मिळत नसल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

पीळ रोगाची लक्षणे : कांद्यावरील पीळ रोगाची सुरुवातीची लक्षणे म्हणजे पानांवर पिवळे ठिपके पडतात. जे पानाच्या संपूर्ण भागावर पसरतात. या रोगाला ट्विस्टर किंवा स्प्रिंग असेही म्हणतात. कोलेटोट्रिचम बुरशीचे



फिलामेंटस जमिनीत वर्षानुवर्षे आणि प्रभावित पिकांच्या अवशेषांमध्ये महिने टिकून राहू शकतात. ज्यामुळे याचा संपूर्ण कांदा पिकावर विपरीत परिणाम होऊ शकतो. कांदा पिकावरील पीळ रोगाचे मुख्य कारण म्हणजे थ्रिप्स कीटक आहेत. कांदा पिकावर थ्रीप्स किडीचा प्रादुर्भाव असल्यास, हे थ्रिप्स कांद्याच्या मऊ भागांना संक्रमित करतात आणि त्यानंतर त्या ठिकाणी बुरशीची वाढ सुरू होते. आणि कांद्याच्या पिकावर पीळ रोगाचा प्रादुर्भाव वाढतो.

पीळ रोग नियंत्रणासाठीचे उपाय : कांदा पिकासाठी पाण्याचा योग्य निचरा होणारी जमीन निवडावी. कांद्याचे प्रमाणित बियाणे वापरावे. ज्यामुळे रोग नियंत्रणास मदत होते. २ किंवा ३ वर्षांनी पिकांची आलटून पालटून लागवड करावी. ज्यामुळे जमिनीची उपयुक्तता टिकून राहते. लागवड करताना रोपांच्या योग्य अंतरासाठी काळजी घ्या. मातीची परिक्षणासह खतांचा योग्य वापर करावा. कांदा लागवड करताना रोपांमध्ये योग्य अंतर ठेवावे. रोगाच्या प्रादुर्भावाची लक्षणे ओळखून, प्रादुर्भाव झालेली झाडे उपटून नष्ट करावीत. शेतात प्रति एकर ८ ते १० पिवळे चिकट सापळे आणि ८ ते १० निळे चिकट सापळे लावावेत. नियमित तण नियंत्रण करावे, जेणेकरून रोगांचा प्रादुर्भाव होत नाही.

# थंडीमध्ये जनावरांच्या आरोग्याची काळजी

पावसाळा संपला, आता थंडीला सुरुवात होत आहे. अचानक होणाऱ्या या वातावरणाचा बदलाचा माणसे तसाच जनावरांवरही परिणाम होतो. त्यामुळे ऋतुनुसार जनावरांच्या व्यवस्थापनामध्ये आवश्यक ते बदल करावे लागतात. शेतकऱ्यांनी जनावरांचा गोठा आणि आहार व्यवस्थापनासोबतच जंत निर्मुलन, लसीकरण आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यावर भर दिल्यास जनावरांचे आरोग्य आणि उत्पादन टिकवू शकतात. या लेखासाठी अकोले येथील सहायक आयुक्त डॉ. अतुल पाटणे यांनी मार्गदर्शन केले आहे.

गोठा व्यवस्थापन : जनावरांना थंडी वाजणार नाही याची व्यवस्था करावी. यासाठी गोठ्याला पडदे किंवा कव्हर लावावे खिडक्या व्यवस्थित बंद कराव्या. थंड वारा लागणार नाही किंवा गोठ्यातील फरशी किंवा जमीन जास्त वेळ ओली राहणार नाही याची काळजी घ्यावी. विशेषत: लहान वासरे, करडे हे जास्त गारठ्यामुळे प्रभावित होतात त्यामुळे त्यांना रात्रीच्या वेळेस बंदिस्त ठिकाणी ठेवावे. जेणेकरुन त्यांचा थंडीपासून बचाव होईल आणि मरतुक कमी होईल शिवाय वाढ चांगली होईल.

शिवाय ज्या भागात जास्त थंडी पडते तेथील गोठ्यांमध्ये पिवळे बल्ब किंवा हिटर किंवा उब देणारे साधने लावावेत. तसेच थंडीमध्ये कोंबड्यांना उबदार ठेवणं अत्यंत आवश्यक असतं यासाठी शेड बंद ठेवणे आणि उब देणारे साधने लावणे गरजेचे आहे. गोठ्यातील डास, माश्या आणि



इतर किटकांसाठी गोठ्यामध्ये कीटकनाशकाची फवारणी वरच्यावर करावी. थंडीच्या दिवसात जनावरं जास्त पाणी पित नाहीत त्यामुळे त्यांना दिवसा उन्हात सोडावे किंवा उन्हात बांधून ठेवावे जेणेकरुन उन्हातून व्हिटामिन डी ३ मिळेल आणि जनावरं पाणी पितील. पाण्यामुळे चाऱ्याचे पचन चांगले होते.

आहार व्यवस्थापन : थंडीमध्ये तापमानासोबत जुळवून घेण्यासाठी जनावरांची भरपूर ऊर्जा खर्च होते. त्यामुळे थंडीच्या काळात जनावरांना ऊर्जायुक्त खाद्य देणे गरजेचे असते.

त्यासाठी जनावरांना पशुखाद्य आणि खुराक जसे की सरकी पेंड, शेंगदाणा पेंड असे ऊर्जायुक्त खाद्य द्यावे आणि कोंबड्यांना ऊर्जायुक्त खाद्य दिलेच पाहिजे. यासोबतच जनावरांना ओला चारा आणि सुका चारा दोन्ही संतुलित प्रमाणात द्यावा. पावसाळ्यानंतर ओला चारा जास्त प्रमाणात उपलब्ध असला तरी सुका चारा किमान ३० टक्के द्यावा तरी द्यावा. जेणेकरुन उत्पादन आणि आरोग्य व्यवस्थित राहते.

जंत निर्मुलन : थंडी सुरु होण्यापूर्वी कोणतंही लसीकरण करण्यापूर्वी जनावरांचे जंत निर्मुलन करणे करजेचे असते. जंत निर्मुलनामुळे जनावरांच्या आतड्यातील जंत नष्ट होतात किंवा शरीराच्या बाहेर टाकली जातात. त्यामुळे जनावरांनी खाल्लेले त्यांच्या अंगी लागते, दूध उत्पादनात वाढ होते आणि एकंदर जनावरांचे आरोग्यच सुधारते. तसेच जंतनिर्मुलनामुळे लसीकरणाचा प्रभाव चांगला होतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी दर तीन महिन्यातून लहान जनावरांपासून मोठ्या जनावरांचे जंत निर्मुलन करावे. जवळच्या पशु औषधांच्या दुकानात आणि पशुवैद्यकीयांच्या सल्ल्याने जनावरांना जंत निर्मुलनाची गोळी द्यावी.

लसीकरण : थंडीमध्ये लाळ्या खुरकुद रोगाचे विषाणू वाढतात आणि पसरतात त्यामुळे थंडीपूर्वी जनावरांमध्ये लाळ्या खुरकुर्द रोगाचे आणि शेळ्या मेढ्यांमध्ये आंतरविशार रोगाचे लसीकरण केलेच पाहीजे. जनावरांचे लसीकरण केल्याने रोगाविरुद्ध प्रतिकारक्षमता वाढते. लसीकरण केल्यावर त्यांना ताप किंवा अन्य लक्षणे दिसले तरी ते चिंताजनक नसतात, एक दोन दिवसांतच ते पुन्हा नॉर्मल आणि स्वस्थ होतात. मात्र लसीकरणामुळे जनावरांवरील मोठा धोका टळतो. लसीकरण हे जनावरांच्या फायद्यासाठीच बनलेले असते. जनावरांचे आरोग्य आणि उत्पादन सुरक्षित रहावे हाच त्यामागचा उद्देश असतो त्यामुळे प्रत्येक लसीकरण पशुवैद्यकीयांच्या सल्ल्यानेच करावे आणि लसीकरणाचे वेळापत्रकही पाळावे.




### महत्वाच्या घटना

१८४६ : एलियास होवे याला अमेरिकेत शिवणाच्या मशिनचे पेटंट मिळाले.
१८९८ : लुइगी लुकेनीने ऑस्ट्रियाची राणी एलिझाबेथची हत्या केली.
१९३९ : दुसरे महायुद्ध कॅनडाने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९४३ : दुसरे महायुद्ध जर्मन फौजांनी रोम ताब्यात घेण्यास सुरूवात केली.
१९३६ : प्रथम जागतिक वैयक्तिक मोटरसायकल स्पीडवे चॅम्पियनशिप आयोजित करण्यात आली.
१९६६ : पंजाब राज्याचे विभाजन होऊन पंजाब व हरियाणा अशी दोन राज्ये अस्तित्वात आली.
१९६७ : जनमत चाचणीत जिब्राल्टरच्या जनतेने स्पेनमधे सामील होण्याऐवजी ब्रिटनमधेच राहण्याचा निर्णय घेतला.
१९७५ : व्हायकिंग-२ हे अमेरिकन मानवविरहित अंतराळयान मंगळ ग्रहाकडे झेपावले.
१९९६ : गोमंतक मराठी अकादमीचा पहिला 'कृष्णदास शामा पुरस्कार' गोमंतकीय मराठी साहित्यिक बा. द. सातोस्कर यांना तर 'पंडित महादेवशास्त्री जोशी मराठी साहित्य पुरस्कार' कवी नारायण सुर्वे यांना जाहीर
२००१ : मार्क इन्ग्रॅम या स्पर्धकाने फसवणूक करुन इंग्लंडमधील कौन बनेगा करोडपती ही स्पर्धा जिंकली.
२००२ : परंपरेने तटस्थ देश स्वित्झर्लंड देश युनायटेड नेशन्समध्ये सामील झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७२ : के. एस. रणजितसिंहजी कसोटी क्रिकेट खेळाडू व महाराजा, यांच्या स्मरणार्थ १९३४ पासून 'रणजी करंडक क्रिकेट स्पर्धा' खेळल्या जातात. (मृत्यू: २ एप्रिल १९३३)
१८८७ : गोविंद वल्लभ पंत स्वातंत्र्यसैनिक, भारताचे दुसरे गृहमंत्री व उत्तर प्रदेशचे पहिले मुख्यमंत्री, भारताचे पहाडी पुरूष, प्रांतिक कॉंग्रेसचे अध्यक्ष, भारतरत्न (१९५७), मागासवर्गीयांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी कुमाँऊ परिषदेची स्थापना केली. (मृत्यू: ७ मार्च १९६१)
१८९२ : नोबेल पारितोषिक विजेता अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ आर्थर कॉम्प्टन यांचा जन्म.
१८९५ : कविसम्राट तेलुगू लेखक विश्वनाथ सत्यनारायण यांचा जन्म.
१९८९ : भारतीय क्रिकेटपटू मनीष पांडे यांचा जन्म.
१९१२ : बसप्पा दानप्पा तथा बी. डी. जत्ती भारताचे ५ वे उपराष्ट्रपती, पाँडेचरी व ओरिसाचे राज्यपाल आणि मैसूर प्रांताचे मुख्यमंत्री, राष्ट्रपती फखरुद्दीन अली अहमद यांच्या आकस्मिक निधनामुळे जत्ती यांच्यावर राष्ट्रपतीपदाची जबाबदारी आली. पाच महिने ते हंगामी राष्ट्रपती (मृत्यू: ७ जून २००२)
१९४८ : भक्ती बर्वे अभिनेत्री (मृत्यू: १२ फेब्रुवारी २००१)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

२१० : २१० इ.स.पू. : चीनची पहिले सम्राट किन शी हुआंग यांचे निधन. (जन्म: १८ फेब्रुवारी २५९)
१९०० : रावबहादूर डॉ. विश्राम रामजी घोले महात्मा फुले यांचे सहकारी व नामवंत शल्यचिकित्सक (जन्म:)
१९२३ : सुकुमार रॉय बंगाली साहित्यिक आणि 'संदेश' या लहान मुलांच्या मासिकाचे संस्थापक, चित्रपट दिग्दर्शक सत्यजित रॉय यांचे वडील (जन्म: ३० आक्टोबर १८८७)
१९६४ : श्रीधर पार्सेकर व्हायोलिनवादक (जन्म:१९२०)
१९८३ : नोबेल पारितोषिक विजेते स्वीस भौतिकशास्त्रज्ञ फेलिक्स ब्लॉक यांचे निधन.
२००० : भारतीय-पाकिस्तानी पत्रकार आणि लेखक झैब-अन-नसीसा हमीदल्ला यांचे निधन. (जन्म: २५ डिसेंबर १९२१)
२००६ : टोंगाचा राजा टॉफाहाऊ टुपोऊ यांचे निधन.

# गुलाब शेती करताना वापरा हे तंत्र

शेतकरी सध्या मोठ्या प्रमाणात फुलशेतीकडे वळत आहे. यामध्ये काही शेतकरी पॉलीहाऊसची उभारणी करून, मोठ्या प्रमाणात गुलाब फुलाची लागवड करत आहेत. मात्र पॉलीहाऊसच्या मदतीने गुलाब फुलाची शेताची करताना काही शेतकऱ्यांना गुलाब फुलाच्या आकारात वाढ होत नसल्याची समस्या असते. त्यामुळे आज आपण पॉलीहाऊसमध्ये गुलाब फुलाची शेती करताना फुलांची साईज कशी वाढवली जाऊ शकते.

फुलांची साईज वाढवण्याचे तंत्र : गेल्या काही वर्षात गुलाबाच्या फुलांच्या मागणीत मोठी झाली आहे. लग्न समारंभ आणि अन्य कार्यक्रमांमुळे फुलांची नेहमीच मागणी असते. इतकेच नाही तर गुलाब फुलापासून गुलाब जल, अत्तर, गुलकंद आणि अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती मिळवल्या जातात. त्यामुळे आता तुम्ही गुलाब फुलाची शेती करण्याची करण्याचा विचार करताना याबाबत अधिक माहिती असणे आवश्यक असते. साधारणपणे बल्बच्या मदतीने गुलाब फुलाचा आकार वाढवण्याचे तंत्र हे पॉलीहाऊस पद्धतीत वापरले जाते.

बल्बचा वापर ठरतो प्रभावी : गुलाब शेती करताना झाडांना प्रकाशाची मोठ्या प्रमाणात आवश्कयता असते. प्रकाशाच्या मदतीने गुलाब फुलांच्या कळ्यांचा विकास वेगाने होतो. तज्ज्ञांच्या मते पॉलीहाऊसमध्ये गुलाब शेती करताना जास्त प्रकाश आणि तापमान कमी ठेवल्यास झाडांना अधिक फुटवे फुटतात. यासाठी शेतकऱ्यांनी बल्बचा वापर केल्यास शेतकऱ्यांना अधिक आकाराचे फुल मिळण्यास मदत होते. दरम्यान, पॉलीहाऊसमध्ये शेडनेटमुळे तापमान कमी होऊन जाते. त्यामुळे थंडीच्या दिवसांमध्ये अधिक उत्पादन मिळवण्यासाठी हा उपाय करणे अगत्याचे ठरते. फुले तोडणीची पद्धत : गुलाब फुलांची तोडणी प्रामुख्याने कळीच्या अवस्थेत तोंडाने आवश्यक असते. ज्यावेळी कळीच्या एक किंवा दोन पाकळ्या खुलणे बाकी असते. त्यावेळी फुलांची तोडणी आवश्यक करणे असते. विशेष म्हणजे गुलाबाची तोडणी करताना कळी खूप मोठी होऊ देऊ नये, लहान अवस्थेत तोडलेली कळी पूर्ण क्षमतेने खुलण्यास मदत होते. याशिवाय फुलाची तोडणी करताना लांब दांडे ठेवून, तिरका काप द्यावा. तोडणीनंतर गुलाबाचे फुल पाण्यात बुडून ठेवावेत. ज्यामुळे विक्रीला नेताना ते अधिक काळ ताजेतवाने राहण्यास मदत होते.





# व्यापाऱ्यांच्या समस्या जिल्हाधिकारी यांनी जाग्यावरच मार्गी लावल्या -सतीश पंच

जालना । प्रतिनिधी

जालना बाजार समितीला स्वयंस्फूर्तीने जिल्हाधिकारी डॉ. आशिमा मित्तल यांनी भेट देऊन दाखवलेली कार्यतत्परता आणि थेट संवादाची पद्धत व्यापारी, कामगार आणि शेतकरी या तिन्ही घटकांसाठी प्रेरणादायी ठरली आहे. त्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरातील आडत, किराणा मार्केट आणि गूळ मार्केटला प्रत्यक्ष भेट देत व्यापारी वर्ग, कामगार व शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. त्यांच्या या भेटीने सर्वच घटकांचे मनोबल उंचावले असून, यामुळे व्यापार आणि उत्पादनात लक्षणीय वाढ होईल, असा ठाम विश्वास जालना होलसेल किराणा मार्केट असोसिएशनचे अध्यक्ष व जालना व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सतीश पंच यांनी व्यक्त केला.

सतीश पंच यांनी सांगितले की,



जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केवळ ऐकून घेतले नाही, तर काही समस्या जागेवरच मार्गी लावल्या, तर काही तातडीने सोडविण्यासाठी स्पष्ट आश्वासन दिले. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाचा योग्य भाव मिळावा, व्यापाराचा विस्तार व्हावा आणि कामगारांच्या अडचणी दूर व्हाव्यात, यासाठी त्यांनी दिलेले निर्देश अत्यंत उपयुक्त आहेत.

अशा प्रकारे प्रशासकीय पातळीवरून व्यापाऱ्यांना, शेतकऱ्यांना आणि कामगारांना थेट प्रतिसाद मिळाल्याने आत्मविश्वास वाढला आहे. 'आपल्या मागे प्रशासन ठामपणे उभं आहे' ही भावना निर्माण झाली असून, त्यामुळे निश्चितच जालना बाजारपेठेत व्यापार दुप्पट वेगाने वाढेल. जिल्हाधिकारी मित्तल यांची ही पुढाकारवृत्ती आणि संवेदनशीलता संपूर्ण व्यापारवर्गासाठी नवी उर्जा घेऊन आली आहे. बाजार समितीचा सर्वांगीण विकास, शेतमालाला स्पर्धात्मक भाव, तसेच कामगारांच्या सामाजिक सुरक्षेसाठी प्रशासनाच्या हस्तक्षेपामुळे जालना जिल्हा 'आदर्श बाजारपेठ' म्हणून ओळखला जाईल, असा विश्वास व्यापारी वर्गात व्यक्त केला जात असल्याचे सतीश पंच म्हणाले.

## केंद्रीय युवा महोत्सवात पाझर एकांकिकेला प्रथम पारितोषिक



बीड । प्रतिनिधी

श्रीमती नाथिबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई येथे पार पडलेला राज्यस्तरीय केंद्रीय युवा महोत्सव रविवारी जल्लोषात संपन्न झाला. ४ ते ५ ऑक्टोबरदरम्यान पार पडलेल्या या महोत्सवात प्रादेशिक पातळीवर विजेते ठरलेल्या संघांनी विविध कलाप्रकारांमध्ये सहभाग नोंदवला. या महोत्सवात तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीडच्या विद्यार्थिनींनी आपल्या अभिनयातून समाजातील स्त्रीच्या वास्तवाला वाचा फोडली. त्यांच्या पाझर या हृदयस्पर्शी एकांकिकेने परीक्षकांची मनं जिंकत पहिला क्रमांक पटकावला.

या नाट्यप्रयोगातून ग्रामीण स्त्रीजीवनातील संघर्ष, आत्मसन्मान आणि सामाजिक वास्तवाचे जिवंत चित्रण प्रभावीपणे साकारण्यात आले. उत्कृष्ट अभिनय, प्रभावी संवाद आणि दिग्दर्शनामुळे पाझर ने परीक्षक तसेच प्रेक्षकांवर ठसा उमटवला. या विजयामुळे महाविद्यालयीन परिसरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले असून, तुलसी शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे यांनी संपूर्ण टीमचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या मेहनतीचे कौतुक केले. तसेच संस्थेचे विश्वस्त डॉ.सुनील जोंधळे, प्राचार्य डॉ. अश्विनी बेद्रे, प्राध्यापक व सहविद्यार्थ्यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले. संघप्रमुख प्रा.सुप्रिया ससाने, प्रा.श्वेता वंजारे यांच्या नेतृत्वाखाली संघाने उत्कृष्ट कामगिरी बजावली आणि संघाच्या मेहनतीला पारितोषिक मिळाले.

# एसटी आरक्षणात इतर जातींचा समावेश नको

## सकल आदिवासी समाजाचे क्रांती चौकात धरणे

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

बंजारा, वंजारी, गोपाळ, धनगर आदी विविध जातीसमूहाकडून त्यांचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करण्याची मागणी होत असून, अनुसूचित जमातीच्या (एसटी) आरक्षणामध्ये इतर कोणत्याही जातीला समाविष्ट करू नये, यासह विविध मागण्यांसाठी सकल आदिवासी समाजाच्या वतीने क्रांती चौकात धरणे आंदोलन करण्यात आले.

राज्य शासनाने २ सप्टेंबर २०२५ रोजी काढलेल्या जीआरनुसार विविध जातीसमूहांकडून एसटी प्रवर्गात समावेश करण्याची मागणी होत आहे. त्यास आदिवासी समाजाने विरोध केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार नोकरीत अधिसंख्या करण्यात आलेल्या १२,५०० पदांची विशेष भरती तात्काळ सुरू करावी. एससी, एसटी प्रवर्गामध्ये उपवर्गीकरणाची अंमलबजावणी करण्यात येऊ नये. पेसा भरती



प्रक्रिया सुरू करावी. छोटा संवर्ग बिंदू नामावली शासन निर्णय २४ फेब्रुवारी २०२२ मध्ये आदिवासी बिंदू ८ नंबरवर फेकला गेला आहे, त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांवर अन्याय झाला आहे. २७ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयामध्ये दुरुस्ती करून आदिवासी बिंदू क्र. २ वर आणावा. जात पडताळणी समितीकडे प्रलंबित असलेली सर्व सशर्त (कंडिशनल व्हॅलिडीटी) प्रकरणे आणि नियमित प्रलंबित प्रकरणे विशेष मोहिमेद्वारे तात्काळ निकाली काढण्यात यावी, यासह मागण्यांसाठी धरणे आंदोलन करण्यात आले.

# सरपंचाच्या सांगण्यावरून ५ हजाराची लाच घेताना एकास अटक

हिंगोली । प्रतिनिधी

घरकुलाच्या संयुक्त पाहणी अहवालावर स्वाक्षरी करून दुसरा हप्ता मिळवून देण्यासाठी घोडा (ता. कळमनुरी) येथील सरपंचाच्या सांगण्यावरून पाच हजाराची लाच घेणाऱ्या एकास लाचलुचपत विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले. या प्रकरणी कळमनुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

कळमनुरी तालुक्यातील घोडा येथील तक्रारदारास त्याच्या वडिलांच्या नावे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल मंजूर झाले होते. या घरकुलाचा पहिला हप्ता देखील मिळाला होता. त्यानंतर दुसऱ्या हप्त्यासाठी संयुक्त पाहणी अहवालावर स्वाक्षरी करून ७० हजाराचा दुसरा हप्ता मिळवून देण्यासाठी सरपंच रावसाहेब पाईकराव याने गावातील सोनबा पतंगे यांच्या मार्फत पाच हजार रुपयांची लाच मागितली. या प्रकरणात तक्रारदाराने थेट लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. त्यावरून लाचलुचपत विभागाने पडताळणी केली. यामध्ये सरपंच रावसाहेब याने सोनबा याच्या कडे पाच हजार



रुपये देण्याचे सांगितले. त्यावरून पोलिस अधिक्षक संदीप पालवे, अप्पर पोलिस अधिक्षक अशोक कदम यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी दुपारी लाचलुचपतचे उपाधिक्षक विकास घनवट, पोलिस निरीक्षक राजेश मलपिल्लू, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक युनुस शेख, विजय शुक्ला, जमादार राजाराम फुफाटे, भगवान मंडलिक, विनोद पुंडगे, शिवाजी वाघ, शेख अकबर यांच्या पथकाने कळमनुरी येथे सापळा रचला होता. दरम्यान, ठरल्याप्रमाणे तक्रारदाराने पाच हजार रुपये घेऊन कळमनुरी गाठले. यावेळी सोनबा पतंगे याने लाचेची रक्कम घेताच त्यास लाचलुचपतच्या पथकाने रंगेहात पकडले. या प्रकरणी पोलिस निरीक्षक राजेश मलपिल्लू यांच्या तक्रारीवरून सरपंच रावसाहेब पाईकराव, सोनबा पतंगे यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या प्रकरणात सरपंच रावसाहेब याच्या शोधासाठी पोलिसांचे पथक रवाना करण्यात आले आहे.

## सम्यक दृष्टिकोनातून समाजपरिवर्तन शक्य-प्रा.डॉ.धन्वे

बीड/प्रतिनिधी

आधुनिक समकालीन समस्यांचे उत्तर तथागतांच्या सम्यक दृष्टिकोनातून मिळते. तथागतांचा धम्म हा प्रकाशाकडून प्रकाशाकडे नेणारा सम्यक सन्मार्ग आहे. आजच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक तसेच शैक्षणिक क्षेत्रातील गोंधळ, अन्याय, विषमता आणि मूल्यांचा ऱ्हास या सर्व समस्यांचे समाधान आपण बुद्धांच्या सम्यक विचारधारेत शोधू शकतो. असे प्रभावी मत प्रा.डॉ. विक्रम धन्वे यांनी व्यक्त केले.बीड तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.आनंद कौसल्यायन नगर येथे, आश्विन पौर्णिमा व वर्षावास समापन निमित्ताने मंगळवार (ता.७) रोजी धम्मदेसना,सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था सचिव भिक्खु धम्मशील थेरो यांच्या वर्षावास निमित्ताने हा कार्यक्रम पार पडला. त्यावेळी प्रा.डॉ. विक्रम धन्वे बोलत होते. यावेळी भन्ते बुद्धबोधी,

बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे, फुले आंबेडकरी चळवळीतील कृतिशील कार्यकर्ते अनिल डोंगरे, माजी सभापती श्रीहरी मोरे, बौद्ध धम्म स्विकारण्याची घोषणा करणारे नितीन मुजमुले, अंनिसचे अतुल बडवे, कैलास खरात, किशोर वाघमारे आदींची उपस्थिती होती. उपस्थितांना संबोधित करतांना प्रा.डॉ. विक्रम धन्वे म्हणाले की, तथागतांनी सांगितलेले आर्य अष्टांगिक मार्ग हे केवळ धार्मिक नव्हे, तर मानवकेंद्री सामाजिक परिवर्तनाचे तत्व आहे. आज जगात सर्वत्र हिंसा, द्वेष, भेदभाव आणि असहिष्णुता वाढताना दिसते. अशा परिस्थितीत तथागतांचा धम्मच माणसाला अंतर्मुख करून करुणा, प्रज्ञा आणि मैत्रीचा संदेश देतो. तथागतांचा धम्म हा अनुभवाधारित आहे; तो आंधळ्या श्रद्धेवर नव्हे, तर ज्ञान, विवेक आणि अनुभवावर आधारित आहे. त्यामुळे तो माणसाला वास्तववादी आणि जबाबदार जीवनशैलीची जाणीव करून देतो.असे विचार प्रा.डॉ. विक्रम धन्वे यांनी व्यक्त केले.यावेळी भिक्खु धम्मशील थेरो यांनी उपस्थिती बौद्ध उपासक-उपासिका यांना धम्मदेसना दिली.

# डिसेंबरमध्ये लिंगायत समाजाचा महामोर्चा

## अखिल भारतीय लिंगायत समन्वय समितीची माहिती, या आहेत मागण्या



धाराशिव । प्रतिनिधी

लिंगायत धर्माला स्वतंत्र मान्यता देण्यासह समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी ७ डिसेंबर रोजी धाराशिव शहरात महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या महामोर्चाच्या निमंत्रक व स्वागताध्यक्षपदी रवी कोरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

धाराशिव येथील शासकीय विश्रामगृहात अखिल भारतीय लिंगायत समन्वय समिती तर्फे पत्रकार परिषद घेऊन या महामोर्चाची सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी समितीचे राष्ट्रीय समन्वयक अविनाश भोसीकर, बसव ब्रिगेड जिल्हाध्यक्ष परमेश्वर पाटील, तसेच संदीप पाटील (लोहारा), स्वप्नील ढोले (बार्शी), गणेश (भूम) यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत रवी कोरे यांची महामोर्चाचे निमंत्रक व स्वागताध्यक्ष म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या महामोर्चाद्वारे लिंगायत समाजाने केंद्र आणि राज्य सरकारकडे आपल्या स्वतंत्र धर्म मान्यतेच्या मागणीसह शिक्षण, नोकरी, आरक्षण आणि सामाजिक न्यायाशी संबंधित अनेक मागण्या मांडण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. महामोर्चाची तयारी जोरात सुरू असून, जिल्हाभरातून आणि राज्यातील विविध भागांतून हजारो लिंगायत बांधव मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

## शिवानंद आश्रम तमलूर-मदनूर ते श्रीक्षेत्र कपिलाधार २४ वी पायी पदयात्रा

बीड । प्रतिनिधी

त्रिकाल वंदनीय परमपूज्य गुरुवर्य श्री. ष.ब्र.१०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलूरकर यांच्या कृपा, आशीर्वाद आणि मार्गदर्शनाखाली श्री शिवानंद आश्रम, तमलूर-मदनूर ते श्रीक्षेत्र कपिलाधार या २४ व्या पायी पदयात्रेचे आयोजन यंदा भक्तिमय वातावरणात करण्यात आले आहे. ही पवित्र यात्रा शनिवार, दि. २५ ऑक्टोबर २०२५ रोजी शिवानंद आश्रम, तमलूर येथून प्रारंभ होऊन बुधवार, दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी श्रीक्षेत्र कपिलाधार येथे कार्तिक शुद्ध पौर्णिमेच्या दिवशी संपन्न होणार आहे.

गुरुवर्यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या २३ वर्षांपासून पारंपरिक पद्धतीने होणारी ही पदयात्रा भाविकांसाठी आध्यात्मिक साधना, भक्तिभाव आणि आत्मशुद्धीचा महोत्सव ठरली आहे. या यात्रेचा उद्देश साधकांना सांसारिक चिंतामुक्त करून आत्मविकास आणि परमात्मप्राप्तीचा अनुभव देणे हा आहे. दररोज पठण, पारायण, शिवपाठ, भजन-कीर्तन, गुरुआमृत उपदेश अशा कार्यक्रमांनी ही यात्रा दरवर्षी भक्तिभावाने रंगते. यात्रेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक भक्ताला शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक समाधानाचा अनुभव मिळतो. साधू संत तुझे अवतार जाण तयाती शरण नाही गेलो '''"जाती-कुळगोत्र न पाहे शंकर, भक्तांचा माहेर स्वामी माझा'' तमलूरहून सुरू होणारी ही पदयात्रा नरंगल, देगलूर, कावळगाव, करडखेड, मुक्रमाबाद, हाळणी, उदगीर, लोहारा, चामरगा, रेणापुर, बर्दापूर, आंबेजोगाई, धारूर, विडा, कळसंबर, रत्नागिरी मार्गे श्रीक्षेत्र कपिलाधार येथे पोहोचेल. एकूण २८० किलोमीटरचा प्रवास १२ दिवसांत पायी पार केला जाणार असून प्रत्येक गावात स्थानिक भक्तांकडून भाविकांसाठी राहण्याची, फराळाची आणि प्रसादाची व्यवस्था केली जाते. या भक्तिपूर्ण यात्रेचा शिस्तबद्ध, आनंददायी आणि अध्यात्मिक वातावरणात पार पडण्यासाठी सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक मंडळाकडून करण्यात आले आहे.

# सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील हल्ला हा न्यायव्यवस्था व लोकशाहीवरील हल्ला

लिंबागणेश । प्रतिनिधी

सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या दिशेने बूट फेकण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना घडली. वकील राकेश किशोर यांनी "सनातन धर्माचा अपमान सहन करणार नाही'' अशी घोषणा देत सरन्यायाधीशांकडे बूट फेकण्याचा प्रयत्न केला. न्यायालयातील सुरक्षा रक्षकांनी तत्परतेने हस्तक्षेप करत हल्ल्याचा प्रयत्न विफल केला. आरोपी वकिलाला तात्काळ न्यायालयाबाहेर काढून पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. चौकशीदरम्यान आरोपीने सांगितले की, सरन्यायाधीश भूषण गवई यांनी खजुराहो येथील भगवान विष्णूच्या मूर्तीच्या जीर्णोद्धारासंबंधीच्या याचिकेवर तसेच काही धार्मिक संदर्भातील निकालांमध्ये "सनातन धर्माचा अपमान'' केला, असा त्यांचा आरोप आहे.




त्यांनी ही कृती "दैवी प्रेरणेने'' केल्याचा दावा केला असून, त्याबाबत कोणताही पश्चात्ताप नसल्याचे सांगितले आहे. या घटनेचा न्यायालयीन, विधिज्ञ, राजकीय तसेच सामाजिक स्तरावर तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला आहे. बार काउन्सिल ऑफ इंडियाने आरोपी वकिलावर तात्काळ निलंबनाची कारवाई केल्याचे वृत्त आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयातील सुरक्षा व्यवस्थाही अधिक कडक करण्यात आली आहे. सरन्यायाधीश भूषण गवई यांनी सुनावणीदरम्यान उपस्थित वकिलांना शांततेचे आवाहन करत म्हटले "या प्रकारांकडे दुर्लक्ष करा; मला याचा परिणाम होत नाही. या घटनेचा निषेध म्हणून लिंबागणेश गावात मुख्य प्रवेशद्वारासमोर निदर्शने करण्यात आली. निदर्शनांचे नेतृत्व सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन रविंद्र निर्मळ यांनी केले.

या प्रसंगी सरपंच बालासाहेब जाधव, माजी पंचायत समिती सदस्य राजाभाऊ गिरे, बाळकृष्ण थोरात, ऑल इंडिया पँथर सेनेचे तालुका अध्यक्ष अरुण निर्मळ, तसेच औदुंबर नाईकवाडे, अमोल निर्मळ, उमेश थोरात, बालाजी निर्मळ, माजी उपसरपंच शंकर वाणी, तुकाराम गायकवाड, केशव गिरे, नाना निर्मळ, सुरेश निर्मळ, बाळू थोरात, श्रीराम गायकवाड, दादा गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. निदर्शकांनी "न्यायसंस्थेवर हल्ला म्हणजे लोकशाहीवरील हल्ला'' असे सांगत या प्रकाराचा तीव्र शब्दांत निषेध नोंदविला.

# जिल्हाधिकारी यांनी केली कुल भैय्या अनाथालयाची पाहणी

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील सिरसवाडी रोडवर टी.व्ही. सेंटर जवळ महिला व बालविकास कार्यालयाकडून विनाअनुदानित तत्वावर सुरू असलेल्या कुलभैय्या अनाथालयाची (शिशुगृहाची) जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दि. ६ ऑक्टोबर २०२५ रोजी भेट देऊन पाहणी केली.

सदरील शिशुगृहात ० ते ६ वर्षापर्यंतच्या कुमारी मातांची मुले, मुलांमध्ये ज्यांचे आई-वडील दोघेही मृत आहेत अशी अनाथ मुले, जन्मानंतर पालकांनी सोडून दिलेली किंवा रस्त्यावर, रुग्णालयात आढळलेली मुले यात ,कायद्याच्या संरक्षणाखालील मुले यात बाल न्याय (संरक्षण व काळजी) अधिनियम २०१५ अंतर्गत येणारी मुले, जसे की विशेष काळजीची गरज असलेली मुले ज्यांना विशेष काळजी व सुविधा आवश्यक असतात यांचा समावेश



होतो. सद्यस्थितीत या ठिकाणी ३ मुली आहेत व यांची काळजी घेण्यासाठी महिला कर्मचारी पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी या मुलांना बालस्नेही वातावरण निर्माण करणे, मुलांना खेळणी उपलब्ध करुन देणे तसेच परिसरात मुलांना आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे याबाबत आदेशित केले. तसेच जिल्हातील दानशूर व्यक्ती, सामाजिक स्वयंसेवी संस्था यांनी याठिकाणी राहत असलेल्या मुलांना मदत करण्याचे आवाहन केले. महिला व बालविकास कार्यालयाकडून या मुलींना दत्तक घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# तेलगाव - माजलगाव रस्त्यावर दुतर्फा काट्यांचे साम्राज्य

## आधीच रस्त्याला मोठ्या भेगा त्यात हा काट्याचा जीवघेणा प्रवास

पात्रुड । प्रतिनिधी

तालुक्यातील तेलगाव – माजलगाव हा अत्यंत वर्दळीचा आणि महत्वाचा रस्ता असून, या मार्गावरून दररोज शेकडो दुचाकी, चारचाकी आणि मालवाहू वाहने धावत असतात. मात्र गेल्या काही महिन्यांपासून या रस्त्याच्या दुतर्फा काटेरी झुडपांनी अक्षरशः साम्राज्य निर्माण केले आहे. रस्त्याच्या कडेला वाढलेल्या या झुडपांचे काटे आता रस्त्याच्या बाहेर येत आहेत त्या मुळे दुचाकीस्वारांसाठी हा रस्ता जीवघेणा ठरत आहे.

संरक्षक भिंतीबाहेर वाढलेल्या या काटेरी झुडपांमुळे दुचाकी वाहनचालकांना शरीर आणि डोळे वाचवत मोठ्या कसरतीने प्रवास करावा लागत आहे.





मोठ्या वाहनांच्या भरधाव वेगामुळे दुचाकीस्वारांना रस्त्याच्या कडेला जावे लागते आणि त्या वेळी या काट्यांमुळे ओरखडे लागणे, कपडे फाटणे, अगदी डोळ्यांना इजा होण्याचेही प्रकार घडतात.

रात्रीच्या वेळी दृश्यता कमी असल्यामुळे या झुडपांमुळे अपघात होण्याचा धोका आणखी वाढतो आहे. स्थानिक नागरिक, प्रवासी आणि शेतकरी वर्गाने अनेकदा सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच ग्रामपंचायतीचे लक्ष या समस्येकडे वेधले असले तरी अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. नागरिकांचा आरोप आहे की, प्रशासन केवळ तक्रारी ऐकून घेतं पण प्रत्यक्ष काम सुरू करत नाही.

आधीच रस्त्याला मोठ्या भेगा पडल्या आहेत, त्या मुळे गाडी चालवताना जीव मुठीत धरून चालावे लागते, कधी कधी गाडीचं नियंत्रण सुटण्याची शक्यताही असते. हा प्रवास रोज करावा लागतो, पण आता तो जीवघेणा बनला आहे, परिसरातील नागरिकांना विद्यार्थ्यांना या रस्त्यावरून शाळा, कामावर किंवा बाजारात जायचं असतं. पान २ वर

### आ.सोळंके यांनी तातडीने लक्ष देण्याची गरज

संबंधित विभागाला आदेश देऊन रस्त्याच्या दुतर्फा झुडपं तात्काळ हटविण्यास सांगावे, अशी मागणी नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थांनी केली आहे. हा रस्ता तालुक्याचा मुख्य दळणवळण मार्ग आहे. त्यामुळे येथे स्वच्छता व सुरक्षितता राखणे अत्यावश्यक आहे. आमदार साहेबांनी या प्रश्नावर लवकर कारवाई करावी, अन्यथा आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशारा ग्रामस्थांनी व शेतकऱ्यांनी दिला आहे.



# श्री.तुळजाभवानी यात्रेनिमित्त भोपा येथे रंगला कुस्त्यांचा फड

दिंद्रुड ।प्रतिनिधी

नवरात्र उत्सवानंतर कोजागिरी पोर्णिमेच्या निमित्ताने धारूर तालुक्यातील भोपा येथे श्री तुळजाभवानी भव्य दोन दिवसीय यात्रेचे आयोजन ग्रामस्थांच्या वतीने अनादी काळापासून करण्यात येते. धारूर-माजलगाव तालुक्यातील जागृत देवस्थान म्हणून भोपा येथील तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी हजारोंच्या संख्येने भाविक भक्त भोपा येथे दाखल होतात. यात्रेचा निमित्ताने सोमवारी बैलगाड्या ओढण्याचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला.मंगळवार दि.७ रोजी कुस्त्यांची दंगलीचे आयोजन करण्यात आलेहोते. मराठवाड्यातील मल्ल या कुस्तीच्या दंगलीत सहभागी झाले होते. नांदेड, जालना, बीड, धाराशिव,परभणी आदी जिल्ह्यातून मल्ल मंगळवारी सकाळी भोपा येथे दाखल झाले.


धारूर तालुक्यातील बालाघाट डोंगराच्या परिसरात अनेक पैलवान घडत असल्याचे चित्र आहे. गेल्या काही वर्षांपासून नव तरुणांमध्ये कुस्तीची क्रेझ वाढत आहे. धारूर तालुक्यातील पान २ वर

# राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या उपस्थितीत होणार शिवाजीराव पंडित यांचा अभिष्टचिंतन सोहळा

## बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे अभिष्टचिंतन सोहळा आयोजन समितीचे आवाहन, ना. राजन पाटील यांची प्रमुख उपस्थिती

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्याचे भाग्यविधाते माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८८ व्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार , दि.१० ऑक्टोबर रोजी सकाळी १० वा. शिवनगरी, र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे भव्य अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. राजस्थानचे राज्यपाल हरीभाऊ (नाना) बागडे, श्री क्षेत्र नारायणगडाचे मठाधिपती ह.भ.प. शिवाजी महाराज, श्रीक्षेत्र चाकरवाडी संस्थानचे महंत ह.भ.प. महादेव महाराज, राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष ना. राजन पाटील यांच्या शुभहस्ते शिवाजीराव पंडित यांचा यावेळी सत्कार करण्यात येणार आहे. त्यानंतर काल्याचे कीर्तन आणि महाप्रसादाने कीर्तन महोत्सवाचा समारोप होणार असून यावेळी हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन अभिष्टचिंतन सोहळा समितीने केले आहे.





गेवराई तालुक्याचे भाग्यविधाते आणि बीड जिल्ह्याच्या राजकारणातील भिष्माचार्य म्हणून ओळख असलेले पान २ वर

### काल्याचे कीर्तन आणि महाप्रसादाने होणार कीर्तन महोत्सवाचा समारोप

माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यात गेवराई विधानसभा मतदार संघातील सर्व साधु, संत-महंत, किर्तनकार यांचाही हृदय सत्कार अभिष्टचिंतन सोहळा समितीच्यावतीने करण्यात येणार आहे. वाढदिवसानिमित्त होणाऱ्या भव्य सत्कार समारंभानंतर ह.भ.प.शिवाजी महाराज यांचे काल्याचे किर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसाद वाटप केला जाणार आहे भाविक भक्तांनी त्याचा लाभ घेण्याचे आवाहनही आयोजन समितीने केले आहे.

# आरक्षणासाठी आत्महत्या केलेल्या ओबीसी बांधवांच्या कुटुंबीयांना शासनाने आर्थिक मदत करावी -ॲड.राऊत

बीड । प्रतिनिधी

२ सप्टेंबर २०२५ रोजी मराठा आरक्षणासाठी शासनाने हैद्राबाद गॅझेटियरचा जिआर काढल्यामुळे आता ओबीसीचे आरक्षण संपते की काय? या नैराश्यातून ओबीसी समाज बांधवांनी आत्महत्या केल्या आहेत. त्या आत्महत्याग्रस्त नागरिकांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत व शासकीय नौकरी मिळावी अशी मागणी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्यावतीने जिल्हाधिकारी, बीड यांच्या मार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्याकडे करण्यात आली आहे.



जिल्हाधिकारी बीड यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली मागणी

महाराष्ट्र सरकारने हैद्राबाद गॅझेटियरचा जिआर काढल्यानंतर ओबीसी समाजाचे आरक्षण संपुष्टात येते की काय? अशी भीती ओबीसी समाजामध्ये पसरली. आता आपल्या मुलाबाळांना शिक्षणात, नोकरीत आरक्षण मिळणार नाही. अठरा विश्व दारिद्र्यात असलेले आपले कुटुंब त्याच गरिबीत वर्षानुवर्षे होरपळत राहणार या नैराश्यातून बीड जिल्ह्यासह मराठवाडा आणि महाराष्ट्रात अनेक ओबीसी समाज बांधवांनी आत्महत्या करून आपली जीवनयात्रा संपवली. सप्टेंबर २०२५ मध्ये बीड जिल्ह्यातील एकूण सहा ओबीसी बांधवांनी याच नैराश्य भावनेतून गळफास घेत आत्महत्या केल्या. बीड तालुक्यातील नाथापूर येथील कुंभार समाजाचे गोरख नारायण देवडकर, अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर येथील माळी समाजाचे निवृत्ती पांडुरंग यादव, बीड तालुक्यातील खंडाळा येथील वंजारी समाजाचे भालचंद्र नवनाथ केकान, शिरूर तालुक्यातील तागडगाव येथील वंजारी समाजाचे कांचन आदिनाथ सानप, परळी तालुक्यातील पान २ वर

# बीड जिल्हा पोलीसांनी १४ गुन्ह्यातील जप्त ६४४ किलो गांजा नष्ट केला

बीड । प्रतिनिधी

जिल्हा पोलीस दलाच्या कार्यक्षम व तत्पर कारवाईत बीड जिल्हयातील ।। पोलीस स्टेशन अंतर्गत दाखल असलेल्या १४ वेगवेगळया गुन्हयामध्ये जप्त करण्यात आलेल्या एकुण ६४४.१५२ किलोग्रॅम गांजाचा नाश करण्यात आला आहे. हि कारवाई कोर्टाचे आदेशानुसार व अंमली पदार्थ टास्कफोर्स महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार पोलीस अधिक्षक, बीड नवनीत कॉवत साहेब तथा अध्यक्ष डिस्पोजल कमिटी यांचे मार्गदर्शनाखाली सदर कार्यवाही बीड जिल्हयात दिनांक २९.०९.२०२५ रोजी पार पाडण्यात आली आहे.



या मोहिमेअंतर्गत पोलीस अधिक्षक, बीड नवनीत कॉवत साहेब तथा अध्यक्ष डिस्पोजल कमिटी यांचे मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधिक्षक, बीड सचिन पांडकर , अपर पोलीस अधिक्षक, अंबाजोगाई श्रीमती चेतना तिडके मॅडम तसेच क्षेत्रीय अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ जालना रविंद्र जाधव, पोलीस निरीक्षक स्थागुशा बीड शिवाजी बंटेवाड यांनी दोन शासकीय पंचासमक्ष पोलीस मुख्यालय, बीड येथील सिलबंद गोडाउन मधुन बीड जिल्हयातील ११ पोलीस स्टेशन अंतर्गत दाखल असलेल्या १४ गुन्हयातील जप्त गांजा पान २ वर

# फार्मसी महाविद्यालयात एचआयव्ही विषयक जनजागृती शिबिर



अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित बी. फार्मसी महाविद्यालय, अंबाजोगाई येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने एच.आय.व्ही/एड्स विषयक जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले होते. हे शिबिर आयोजित करण्यातचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांमध्ये एच.आय.व्ही./एड्सविषयी जनजागृती , वैज्ञानिक माहिती, सामाजिक संवेदनशीलता आणि प्रतिबंधात्मक उपायांची जाणीव निर्माण करणे हे होते. या शिबिराचे उद्घाटन फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष तरके , प्रदीप जिरे (समुपदेशक , खउढउ), विश्वास लवंदे यांच्या उपस्थिती मध्ये तथा अध्यक्षतेखाली झाले.

पान २ वर

# तेली समाजाला नगरपालिकेत प्रतिनिधित्व देण्याची समाजाची मागणी

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

नगरपालिकेच्या निवडणूकीचे बिगूल वाजायला सुरुवात झाली असून माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे साहेब यांनी तेली समाजाला प्रतिनिधित्व करण्याची संधी देण्याची मागणी तेली समाजातील नागरिकांनी केली आहे. यापूर्वी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वाखाली समाजाला प्रतिनिधित्व दिल्याने तेली समाजातील नगरसेवक, तसेच संस्थांवर संचालक निवडून आले होते. नगरपालिकेच्या निवडणूकीचे बिगूल वाजायला सुरुवात झाली असून नगराध्यक्षपद व नगरसेवकांचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे.

यामुळे ईच्छूक नगराध्यक्ष व नगरसेवक निवडणूकीच्या तयारीला लागले असून प्रभागात भेटीगाठी सुरू केल्या आहेत. शहरात तेली समाज मोठ्या संख्येने आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या नेतृत्वाखाली समाजाला विविध ठिकाणी प्रतिनिधित्व देण्यात आले होते. यावेळी नगरसेवक निवडून आले होते. तसेच वैद्यनाथ बॅंकेत स्वर्गीय गोविंद आप्पा व्यवहारे, विठ्ठल आप्पा चौधरी अनेक वर्षे संचालक, व्हाइस चेअरमन होते. गोविंद आप्पा व्यवहारे बीड जिल्हा बॅंकेवर संचालक होते. विठ्ठल आप्पा चौधरी यांना खादी ग्रामोद्योगवर संधी दिली होती. वर्षा नरेश पिंपळे या नगरसेवक म्हणून निवडून आल्या होत्या. मात्र गेल्या काही वर्षात तेली समाजाला नगरपालिकेत किंवा इतर कुठेही प्रतिनिधित्व देण्यात येत नाही. यामुळे समाजात नाराजी पसरली आहे. आता होणाऱ्या आगामी निवडणुकीत पान २ वर

# आदित्य दंत महाविद्यालयाचा विभागीय क्रीडा स्पर्धांमध्ये ठसा

## चार खेळाडूंची आंतरक्षेत्रीय स्पर्धांसाठी निवड

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (), नाशिक यांच्यावतीने जालना येथील क्रीडा संकुलात ३ ऑक्टोबर २०२५ रोजी आयोजित विभागीय क्रीडा स्पर्धांमध्ये आदित्य दंत महाविद्यालय, बीडने उल्लेखनीय कामगिरी करत आपली ओळख ठळकपणे अधोरेखित केली. महाविद्यालयाचे २१ विद्यार्थी विविध क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी झाले होते, यापैकी चार खेळाडूंनी आंतरक्षेत्रीय स्पर्धांसाठी पात्रता मिळवली आहे.



यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी अभिनंदन करत त्यांच्या उत्कृष्ट खेळाडू वृत्तीला दाद दिली. सुभाषचंद्र सारडा म्हणाले की, ''विद्यार्थ्यांचे हे यश केवळ महाविद्यालयासाठी नव्हे तर संपूर्ण बीड जिल्ह्यासाठी गौरवाचे आहे.''

महाविद्यालयाच्या मुलींच्या व्हॉलीबॉल संघाने उत्कृष्ट कामगिरी करत उपांत्य फेरीत प्रवेश केला आणि स्पर्धेत दुसरे स्थान पटकावले.

विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर खेळाच्या मैदानातही गुणवत्ता सिद्ध केली – डॉ. आदिती सारडा

आदित्य एज्युकेशन ग्रुपच्या संचालिका पान २ वर

# अपघातात मयत झालेल्या पोलीस अंमलदारांच्या वारसांना प्रत्येकी १ कोटीचा विमा मंजुर

बीड । प्रतिनिधी

दिनांक ०९/११/२०२४ रोजी बीड पोलीस दलातील पोलीस हवालदार ७५५ सुनिल सुंदरराव घोळवे यांचे अपघाती निधन झाले होते. तसेच दिनांक २४/११/२०२४ रोजी पोलीस हवालदार ६३६ सुभाष अजिनाथ तेलप यांचे अपघाती निधन झाले होते. दोन्ही पोलीस अंमलदारांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबीयांचा कमावता पुरुष गमावल्याने मोठा आधार गेला होता. परंतु दोन्ही पोलीस अंमलदारांनी मृत्युपुर्वी त्यांचे सॅलरी अकाउन्ट भारतीय स्टेट बँकेत सॅलरी पॅकेज्ड अकाउन्ट मध्ये वर्ग केल्याने सदर अकाऊन्टमध्ये पगार जमा होत असल्याने त्यांना स्टेट बँकेच्या सदर योजनेचा लाभ मिळाला आहे. त्यामुळे त्यांच्या पश्चात त्यांच्या कुटुंबीयांना मोठा आधार मिळाला आहे.



पोलीस अधीक्षकांच्या हस्ते धनादेश वाटप

दोन्ही पोलीस अंमलदारांच्या मृत्युनंतर भारतीयय स्टेट बँकेमार्फत त्यांचा प्रत्येकी १ कोटी रुपयांचा विमा मंजुर करण्यात आला आहे. त्याबाबत आज दिनांक ०९/१०/२०२५ रोजी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी मयत अंमलदार सुनिल सुंदरराव घोळवे यांचे वारस त्यांची पत्नी सुनिता सुनिल घोळवे यांना व मयत अंमलदार सुभाष अजिनाथ तेलप यांचे वारस त्यांची पत्नी पुष्पा सुभाष तेलप यांना १ कोटी रुपयांचा धनादेश देवुन मयत अंमलदारांना न्याय दिला आहे. यावेळी वारसांना मोठा पान २ वर


# जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांचा गुंडगिरी करणाऱ्याला दणका !

## जिल्हयातील दोन गुंडाची एकाच दिवशी कायद्याअंतर्गत हर्सल कारागृहात रवानगी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी जिल्हयाची धुरा सांभाळल्या पासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत त्यांना बीड जिल्ह्याचे नवनियुक्त जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉन्सन यांची खंबीर साथ लाभली आहे. बीड जिल्ह्यातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे व वाळु माफीयांचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन व कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचे योजिले आहे. त्या अनुषघांने पोलीस अधीक्षकांच्या सुचनेवरुन प्रभारी अधिकारी १. पो.नि. पो.स्टे. परळी शहर यांनी दि. ३०.०८.२०२५ रोजी इसम नामे विजय ऊर्फ बाळु संजय साबने वय २५ वर्षे रा. स्नहे नगर, परळी २. स.पो.नि. पो.स्टे. पान २ वर





# शेख बिलालसह तीन नगरसेवकांनी दानवे यांच्या उपस्थितीत बांधले शिवबंधन

## शिवसेना वाढविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करत आहे – जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

बीड । प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली व शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या प्रमुख उपस्थितीत आज बीड शहरातील एल्गार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शेख बिलाल भाई व माजी नगरसेवक शेख नजीब, माजी नगरसेवक शेख मुजीबभाई , माजी नगरसेवक सय्यद फारुख यांच्यासह डॉ. शेख आसिफ शोएब , समीर शेख, फारुख सय्यद, सय्यद शफिक,शेख समीर यांनी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या हस्ते व जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवबंधन हाती बांधून अधिकृत प्रवेश केला.



यावेळी बिलालभाई व तिन्ही नगरसेवकांनी मनोगतात सांगितले, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे पासुन पुढे उद्धवसाहेब ठाकरे हे मुस्लिम समाजाच्या कधीच विरोधात नव्हते,हा विश्वास आम्हाला पटला आहे, त्यामुळे महाराष्ट्र राज्यात आता मुस्लिम समाज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पाठिशी उभा रहात आहे, जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांनीही आपल्या मनोगतात बीड जिल्हात शिवसेना पुन्हा जोमाने उभी करण्यासाठी मी इमानेइतबारे मेहनत घेत असल्याचा विश्वास दानवे साहेबांना दिला . आपल्या मार्गदर्शनपर पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# सातारा दरोडा ते इसिस कनेक्शन; पुण्यात १९ ठिकाणी एटीएसचे छापे

**पुणे । प्रतिनिधी**

इसिसला दहशतवादी कारवायांसाठी निधी उभारल्या प्रकरणात व राष्ट्रविरोधी कारवाई केल्याप्रकरणात शहरात १९ ठिकाणी दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) छापेमारी करत काही जणांना ताब्यात घेतले. यावेळी कोंढवा आणि अन्य ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात डिजीटल साहित्यासोबत इसिसच्या दहशतवाद्यांच्या संपर्कात असलेल्यांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. बुधवारी रात्री मध्यरात्रीपासून पुण्यात पुणे पोलिसांच्या तब्बल २५ हून अधिक पथकांच्या मदतीने एटीएसने ही छापेमारी केली.

एटीएसने जून- जुलै महिन्यात सातार्यात दहशतवाद्यांनी साडी दुकानदाराची लुटमार केल्याप्रकरणात गुन्हा दाखल केला होता. त्यामध्ये अटक केलेल्या दहशतवाद्यांच्या चौकशीत काहींची नावे समोर आल्यानंतर त्या पार्श्वभूमीवर ही कारवाई केल्याचे एटीएसने एका मेसेजद्वारे स्पष्ट केले आहे. बुधवारी (दि.८) रात्री मध्यरात्री पासून गुरूवारी (दि.९) सायंकाळी सहावाजेपर्यंत सुरू असलेल्या कारवाईत कोणाला ताब्यात घेतले हे स्पष्ट केले नाही.

साताऱ्यातील साडीच्या दुकानावर दरोडा टाकून चोरलेल्या रकमेपैकी काही रक्कम संशयित इसिसच्या दहशतवाद्यांनी बॉम्बचे (आयईडी - इप्रूव्हाईज एक्सप्लोझीव्ह डिव्हाईस) साहित्य खरेदी करण्यासाठी वापरल्याची धक्कादायक माहिती तपासात समोर आली होती. एप्रिल २०२३ मध्ये टाकलेला हा दरोडा



म्हणजे दहशतवादी कारवायांच्या निधी उभारणीसाठी केलेले कृत्य असल्याचे तपासातून समोर आले होते. त्याच अनुषंगाने एटीएसने ७/२०२३ हा गुन्हा नव्याने गुन्हा दाखल केला होता. त्याच गुन्ह्याचा तपास पुणे एटीएस करत आहे.

त्याच दरोडा प्रकरणात आत्तापर्यंत चार संशयित दहशतवाद्यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडील तपासात साताऱ्यातील दरोड्याचे इसिस कनेक्शनदेखील उघड झाले.

याप्रकरणात आत्तापर्यंत पुण्यातील इसिस मोड्युल प्रकरणात सहभागी असलेले दहशतवादी मोहम्मद शहानवाज आलम शफीउमा खान ऊर्फ इब्राहीम ऊर्फ प्रिन्स (वय ३२, रा. झारखंड), मोहम्मद युनुस मोहम्मद याकुब साकी ऊर्फ छोटु (वय २७, रा. कोंढवा, मूळ रा. रतलाम, मध्यप्रदेश), जुल्फिकार अली बरोडावाला ऊर्फ लाला ऊर्फ लालाभाई (वय ४४, बोरीवली, राहुर पडगा, भिवंडी, ठाणे, मूळ रा. बरोडा, गुजरात) आणि जून महिन्यात तलाह लियाकत अली खान (वय ३७, रा. कोंढवा) याला मुंबईतील कारागृहातून साताऱ्यातील दरोड्यात सहभाग असल्याच्या कारणावरून अटक करण्यात आली होती.

दि. ८ एप्रिल २०२३ रोजी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास साताऱ्यातील अजंठा चौकात असलेल्या एका साडीच्या दुकानावर पिस्तुलाचा धाक दाखवून दरोडा टाकला होता. यात या दहशतवाद्यांनी एक लाखाची रोकड चोरी करून नेली होती. पुणे मोड्युल प्रकरणातील दहशतवाद्यांना कोथरूडमध्ये पकडल्यानंतर त्यांचा सातार्यातील दरोड्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर हा गुन्हा पुणे एटीएस करत आहे. याच गुन्ह्याच्या अनुषंगाने संशयीतांकडे करण्यात आलेल्या चौकशीत नवीन नावे निष्पन्न झाल्याने शहरात १९ ठिकाणी छापेमारी करण्यात आली असल्याचे बोलले जात आहे.

कारवाईत पुणे पोलिसांची २५ पथके कारवाईसाठी सज्ज ठेवण्यात आली होती. त्यामध्ये ३५ सहायक पोलिस निरीक्षक व उपनिरीक्षक ३०० पोलिस कर्मचारी तीन पोलिस उपायुक्त, चार सहायक पोलिस आयुक्त हे कारवाईत सहभगी झाले होते. त्याबरोबरच क्वीक रिस्पॉन्स टीमचे पथक, गुन्हे शाखेची पाच पथके तैनात करण्यात आली होती. गुरूवारी सायंकाळपर्यंत ही छापेमारी सुरू होती. पुण्यातून फरार झालेल्या दहशतवाद्याला दिल्ली स्पेशल सेलने मोहंमद साकी याला अटक केल्यानंतर त्याच्याकडील तपासात साताऱ्यात दरोडा टाकल्याचे निष्पन्न झाले. तसेच, पिस्तुलाचा धाक दाखवून एक लाख लुटल्याची कबुली. त्याला यासाठी जुल्फीकार बरोडा वाला याने मदत केल्याचेही त्याने सांगितले होते.

## आंदेकर टोळीतील दोघे फरार जेरबंद; खंडणी विरोधी पथकाची कारवाई



**पुणे । प्रतिनिधी**

कुख्यात आंदेकर टोळीशी संबंधित असलेल्या आणि मोक्का कारवाईनंतर फरार झालेल्या दोघा सराईतांना गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाने अटक केली. बुधवारी (दि. ८) संगमवाडी परिसरात ही कारवाई केली.

अमित सुधाकर बहादुरकर ( ३६, रा. हडपसर) आणि स्वप्निल विलास बहादुरकर ( ३७, रा. नाना पेठ) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. आरोपी हे आंदेकर टोळीशी संबंधित असून, गंभीर गुन्ह्यांमध्ये त्यांचा सहभाग असल्याची माहिती पोलिस तपासातून समोर आली आहे. खंडणी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक छगन कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक राजेश माळेगावे, अंमलदार अमोल आवाड, राजेंद्र लांडगे, रहीम शेख यांच्यासह पथक गस्तीवर होते. त्यादरम्यान संगमवाडी परिसरात आरोपी असल्याची माहिती पथकाला मिळाली.सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले. दोघे सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर फरासखाना पोलीस ठाण्यात मोक्काअंतर्गत कारवाई करण्यात आली होती. तेव्हापासून ते फरार होते. सहायक पोलीस आयुक्त विजय कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

## विश्वकर्मा विद्यापीठाचा ७वा पदवीदान सोहळा उत्साहात संपन्न

**पुणे । प्रतिनिधी**

फ्लिटगार्ड फिल्टर्स प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक निरंजन किर्लोस्कर यांनी तंत्रज्ञान वेगाने बदलत असताना नव्या पिढीला बदलाशी जुळवून घेत प्रत्येक कामात पुढाकार घेण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी तरुण पदवीधर विद्यार्थांना सतत नवीन प्रयोग करण्याबरोबर आवडीने काम करत अपयशाची भीती न बाळगण्याचा सल्ला दिला. आत्मविश्वास आणि जलद निर्णयक्षमतेने तणाव कमी करता येतो आणि यश मिळवता येते, असेही त्यांनी स्पष्ट केले. काल बुधवारी विश्वकर्मा विद्यापीठ, पुणे यांच्या सातव्या पदवीप्रदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

विद्यापीठाच्या प्रांगणात ८ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या या पदवीदान समारंभात विविध विद्या शाखांतील विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. विद्यार्थ्यांना



संबोधीत करताना किर्लोस्कर म्हणाले, नवीन कल्पना वापरण्याची तयारी ठेवा आणि अपयशाची भीती बाळगू नका. नेहमी नम्र राहा, पाय जमिनीवर ठेवा आणि कधीही काम नाकारू नका. लोक कामाच्या तणावाबद्दल भरपूर बोलतात, पण त्याचे खरे कारण म्हणजे निर्णय घेण्यात होणारा विलंब आहे. आयुष्यात घेतलेले निर्णय कधीही बरोबर किंवा चूक नसतात तर परिस्थितीनुसार घेतलेले निर्णयच महत्त्वाचे असतात. निर्णय घेण्यास उशीर कराल, तर तणाव वाढतो. निर्णय घ्या, आणि तो लवकर घ्या.

विद्यापीठाचे अध्यक्ष भरत अग्रवाल म्हणाले की, हा दिवस विद्यार्थ्यांसाठी जितका खास आहे, तितकाच त्यांच्या पालकांसाठी अभिमानाचा आहे. त्यांनी पदवीधरांना त्यांच्या मित्र, वरिष्ठ, कनिष्ठ, प्राध्यापक, कुटुंब आणि मित्रमंडळी यांच्याशी सतत संपर्कात राहण्याचे आवाहन केले. सोशल मीडिया आणि मेसेजिंग ॲप्समुळे आता हे जास्त सोपे झाले आहे, असेही ते म्हणाले.

वर्षभरातील विद्यापीठाच्या यशस्वी वाटचालीचा मागोवा घेताना विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. मुकुंद कुलकर्णी म्हणाले, आजचा दिवस ही विश्वकर्मा विद्यापीठाच्या वाटचालीतील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. पदवीप्रदान सोहळा हा शैक्षणिक यशाचा उत्सव आहेच, पण तो आपली चिकाटी, नवकल्पना आणि सामूहिक प्रयत्न यांचाही आरसा आहे. अवघ्या एका दशकात विश्वकर्मा विद्यापीठाने भक्कम पायाभरणी केली असून आज ते नवकल्पकता, आंतरशाखीय दृष्टिकोन आणि उद्योग जगताशी असलेला संपर्क यांसाठी ओळखले जात आहे. या पदवीप्रदान समारंभात एकूण १,१८५ विद्यार्थ्यांनी पदवी मिळाली, त्यामध्ये १६ पीएच.डी. प्राप्त विद्यार्थ्यांचाही समावेश होता. पदवीधारकांमध्ये आर्किटेक्चरमधील ४८, कला व डिझाईनमधील ४८, वाणिज्य व व्यवस्थापनमधील २३९, मानव्य शाखा व सामाजिक शास्त्रामधील १०६, कायदा शाखेतील १९९, माध्यम व जनसंवाद शाखेमधील १५, औषधनिर्माण अभ्यासक्रमातील १२१ आणि विज्ञान व तंत्रज्ञान शाखेतील ४०९ विद्यार्थी समाविष्ट होते.

## महापालिका आयुक्त पदासाठी इटनकार यांचे नाव चर्चेत

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या बदलीनंतर त्यांच्या जागी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तपदासाठी विपिन इटनकर यांचे नाव जवळपास निश्चित आहे. ते सध्या नागपूर जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत आहेत.आयुक्त सिंह यांची तीन वर्षांची कारकीर्द पूर्ण झाल्याने मंगळवारी (दि.७) शासनाकडून त्यांची बदली करण्यात आली. त्यांना कुंभमेळा आयुक्त म्हणून नियुक्त करण्यात आले. तर, तुर्तात महापालिका आयुक्तपदाचा तात्पुरता कार्यभार महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. मात्र, महापालिकेला नवीन आयुक्त कोण भेटणार हा, प्रश्न अनुत्तरीत होता. मात्र, पिंपरी-चिंचवडला नवे आयुक्त म्हणून विपिन इटनकर यांचे नाव समोर आले आहेत्यांची आयुक्तपदी वर्णी लागणार असल्याचे निश्चित आहे. आता इटनकर हे ऑगस्ट २०२२ पासून नागपूरचे जिल्हाधिकारी आहेत. ते २०१४ च्या महाराष्ट्र बॅचमधील भारतीय प्रशासकीय सेवेचे अधिकारी आहेत. त्यांनी भारत निवडणूक आयोगाच्या मिशन युवा अभियानात उत्कृष्ट कामगिरी केल्याने त्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते गौरविण्यात आलेले आहे. ते मूळचे चंद्रपूर जिल्ह्यातील असून शिस्तप्रिय व संवेदनशील अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे.



## मित्रानेच केला मित्राचा घात; जुन्या वादातून घेतला जीव

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर शहर परीसरात एक हादरवून सोडणारी धक्कादायक घटना बुधवारी दि.`८ रोजी सायंकाळी उघडकीस आली. जुन्या वादातून मित्रानेच आपल्या साथीदाराचा निर्घृण खून केल्याची घटना शिरूर शहरातील पुणे-अहिल्यानगर महामार्गावरील गंगानगर येथे सायंकाळी साडेपाचच्या सुमारास घडली. या घटनेत संतोष मारुती ढोबळे (वय २१, रा. वाडा कॉलनी, शिरूर, मूळ रा. असोला ढोपळा, ता. औंढा नागनाथ, जि. हिंगोली) या तरुणाचा मृत्यू झाला आहे. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत अवघ्या काही तासांत तीन संशयितांना ताब्यात घेतले असून, त्यांची सखोल चौकशी सुरु आहे.

पोलिस हेल्पलाइन ११२ वर शिरुरच्या गंगानगर परिसरातील झुडपांमध्ये तरुणाचा मृतदेह आढळल्याची माहिती मिळताच, शिरूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले, पोलिस निरीक्षक संदेश केंजळे, उपनिरीक्षक शुभम चव्हाण व त्यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. सीमाभिंतीलगत रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या मृतदेहाची ओळख त्याच्या खिशात सापडलेल्या पाकिटातील कागदपत्रे व छायाचित्रावरून पटली. त्यानंतर पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शिरूर उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला.

प्राथमिक चौकशीतून समोर आले की, मृत संतोष ढोबळे याचे संशयितांशी मैत्रीचे संबंध होते; मात्र अलिकडे त्यांच्यात वारंवार वाद होत होते. एका जुन्या वादातून रागाच्या भरात मित्रांनीच त्याला शिरूर बायपासजवळ बोलावून घेत धारदार शस्त्रांनी वार करून ठार मारले, अशी माहिती पोलिसांनी दिली.

या प्रकरणामुळे एकच खळबळ उडाली असून, 'मित्र' या नात्याची मर्यादा ओलांडणारी ही हृदयद्रावक घटना सर्वत्र चर्चेचा विषय ठरली आहे. या घटनेचा पुढील तपास शिरूर पोलिस ठाण्याचे निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. अशा घटनेंमुळे शिरूर परिसरात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून शिरूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत दरोडे, सोनसाखळी चोऱ्या, दुचाकी चोऱ्या,विद्युत रोहीत्र,विद्युत मोटारी चोऱ्या मोठ्या प्रमाणात वाढल्या आहे.त्यामुळे असे वारंवार होणारे गंभीर गुन्हे उघडकीस आणून गुन्हेगारांवर अंकुश मिळवणे आवश्यक आहे. अन्यथा शिरूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असे गंभीर गुन्हे वारंवार घडतच राहतील.

## पुणे-सोलापूर महामार्गावर भीषण अपघात; शाळेच्या बसमध्ये घुसल्या लोखंडी सळई

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे-सोलापूर महामार्गावर सोरतापवाडी (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीत बुधवारी (८ ऑक्टोबर) दुपारी २.३० वाजण्याच्या सुमारास स्कूल बस आणि लोखंडी गज वाहतूक करणाऱ्या पिकअप वाहनाचा भीषण अपघात झाला. पिकअपमधील लोखंडी सळया स्कूल बसच्या मागील भागात घुसल्या, तर पिकअपला मागून येणाऱ्या हायवानेच जोरदार धडक दिली. ही घटना देवकर पेट्रोल पंपाजवळ घडली असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, ही स्कूल बस 'ऑलिंपस स्कूल ऑफ एक्सलन्स' संस्थेची असून, पुणे येथून उरुळी कांचनकडे जात होती. याचवेळी लोणी काळभोर येथील 'गुरुदत्त सेल्स कार्पोरेशन'च्या पिकअपने समोरून धडक दिली. अपघाताचे नेमके कारण अद्याप निश्चित झाले नसले तरी वाहनांचा वेग आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन कारणीभूत असावे, असे प्राथमिक तपासात निदर्शनास आले आहे.

अपघातानंतर घटनास्थळी वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. उरुळी कांचन पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. अपघाताची नोंद घेणे आणि तपास सुरू आहे. या महामार्गावर वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे वाहनचालकांना सतर्क राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी घोडेगावात उबाठा शिवसेनेचे आंदोलन

**आंबेगाव । प्रतिनिधी**

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित हेक्टरनिहाय ५० हजार रुपये अनुदान मंजूर करावे, शेतकऱ्यांचे वीज बिल माफ करावे, बँक वसुली थांबवावी व नुकसानभरपाई तातडीने द्यावी. या मागणीसाठी घोडेगाव तहसील कार्यालय (ता.आंबेगाव) येथे आंदोलन पार पडले.

आंदोलनात उद्धव ठाकरे शिवसेना जिल्हा प्रमुख सुरेश भोर, जिल्हा संघटक राजाभाऊ बाणखेले, उद्धव ठाकरे शिवसेनेचे तालुकाप्रमुख नितीन भालेराव, जिल्हा संघटक रोहन कानडे, शाखाप्रमुख हर्षल भालेराव ,उपशाखा प्रमुख प्रमोद पिंगळे,स्वप्निल भालेराव, सुभाष भालेराव, विनोद घुले, अजित



मोरडे, दत्तात्रय खानदेशे, शीतल बागल, संजय थोरात, नंदकुमार बोऱ्हाडे, हेमंत एरंडे, भरत मोरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. आंबेगाव तालुक्यातील बऱ्याच भागांमध्ये झालेल्या पूरामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. पूरग्रस्त भागात शेतकऱ्यांची जमीन खरडून गेली असून मातीही शिल्लक राहिली नाही. उभी असलेली पिके वाहून गेली आहेत, काही पिके पूर्णपणे नष्ट झाली आहेत. तसेच शेतकऱ्यांची जनावरे वाहून गेली किंवा घरातच पडली आहेत. यामुळे शेतकरी कुटुंबांसमोर उपजीविकेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. आंदोलनाद्वारे शेतकऱ्यांचे हक्क सुरक्षित करण्यासाठी आणि त्वरित मदत मिळवण्यासाठी शासनाला ताकीद देण्यात आली.नायब तहसीलदार शांताराम किर्वे यांना निवेदन देण्यात आले.

## महापालिकेतील आरक्षीत प्रभागांसाठीची सोडत लांबणीवर

पुणे - पुणे महापालिकेची प्रभाग रचना अंतिम झाल्यानंतर आता आरक्षीत प्रभाग कोणते? हे ठरविण्यासाठी सोडत काढली जाणार आहे. यासाठी १० ऑक्टोबर ही संभाव्या तारीख सांगितली जात होती. पण आता याबाबत आयोगाकडून कोणतेही आदेश न आल्याने आरक्षण सोडतीचा कार्यक्रम लांबणीवर पडला आहे. दिवाळीच्या पूर्वी सोडत निघण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी १६५ नगरसेवक निवडून दिले जाणार आहेत. त्यासाठी ४१ प्रभाग तयार करण्यात आले आहेत. प्रारूप प्रभाग रचनेवर हरकती सूचना नोंदविण्यात आल्या, त्यावर सुनावणी घेण्यात आली. त्यात ५ हजार ९२२



हरकती सूचनापैकी १ हजार ३२९ हरकती पूर्ण मान्य करण्यात आल्या असून, ६९ हरकतींचा अंशतः मान्य करून बदल केले आहेत.

तर ४ हजार ५२४ हरकती नामंजूर करण्यात आल्या आहेत. हरकती सूचनेनंतर प्रभाग क्रमांक १, ४, १४, १५, १७, १८, २०, २४, २७, ३४, ३८, ३९ येथील हद्दीमध्ये बदल झाले आहेत. मध्यवर्ती भागापेक्षा उपनगरांमध्ये बदल जास्त झाले आहेत. सर्वाधिक बदल हे प्रभाग क्रमांक चार आणि प्रभाग क्रमांक ३८ मध्ये झाले आहेत. प्रभाग रचना अंतिम झाल्यानंतर अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्ग प्रवर्ग (ओबीसी) आणि महिलांसाठीचे प्रभाग आरक्षित करणे आवश्यक आहे. हे आरक्षण जाहीर झाल्यानंतर कोण कोणत्या प्रभागातून निवडणूक लढविणार हे स्पष्ट होणार आहे. शासनातर्फे ही सोडत १० ऑक्टोबररोजी काढली जाणार असल्याचे सांगितले जात होते. पण शासनाकडून पुणे महापालिकेला कोणतेही आदेश न आल्याने सोडत लांबणीवर पडली आहे. पुढील आठवड्यात १५ ऑक्टोबरही संभाव्य तारीख असण्याची चर्चा आहे. महापालिका प्रशासनाला याबाबत कोणतेही आदेश आलेले नाहीत. पण दिवाळीपूर्वी सोडत काढली जाईल असे सांगितले जात आहे. या सोडतीमध्ये अनुसूचित जमातीचे दोन, अनुसूचित जातीचे २२ प्रभाग आरक्षीत होणार आहेत.तर महिलांसाठी ५० टक्के आरक्षण असल्याने प्रत्येक प्रभागात दोन

## सचिन घायवळ शस्त्र परवाना प्रकरण! ज्यांनी ज्यांनी शिफारस पत्रे दिली त्यांची नावे सांगा –धगेकर

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील कुख्यात गुंड निलेश घायवळ परदेशात पळून गेला आहे. त्याच्याबाबत आता रोजच नवनवे खुलासे होत आहेत. सध्या निलेश घायवळचा भाऊ सचिन घायवळ याला मिळालेल्या शस्त्र परवान्याचे प्रकरण चांगलेच गाजत आहे. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यावर टीका होत आहे. यावर माजी आमदार आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते रविंद्र धंगेकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. शस्त्र परवाना देण्यासाठी शिफारस पत्र लागतं, ज्यांनी ज्यांनी शिफारस पत्र दिले त्यांची नावे सांगा असेही ते म्हणाले. मंत्री योगेश कदम यांची जर चूक झाली असेल तर आम्ही त्यांना ती चूक दुरुस्त करायला लावू असेही धंगेकर म्हणाले.



पोलिसांनी शस्त्र परवाना नाकारल्यानंतर आमदार खासदाराच्या शिफारस लागते. त्यानुसार गृह खाते त्याला शस्त्र परवाना देते. योगेश कदम यांना टार्गेट न करता ज्यांनी शिफारस केली. तो फॉर्म शोधून त्यावर कोणाच्या सह्या आहेत ते बघावे लागेल असेही ते म्हणाले. निलेश घायवळला मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मदत केली अस वाटतं? असा प्रश्नव विचारला असता धंगेकर म्हणाले की, समीर पाटील नावाचा व्यक्ती आहे हा निलेश घायवळची गुन्हेगारी चालवतो. त्यातल्या कर्त्या करवित्याची चौकशी झाली पाहिजे. त्याला अटक झाली पाहिजे. समीर पाटील हा चंद्रकांत दादांची भाषा बोलत असेल तर मी त्याला उत्तर देईल असे धंगेकर म्हणाले. रोहित पवार काय म्हणाले हे मला माहित नाही. पुण्यातील गुन्हेगारीला आळा बसला पाहिजे, एवढेच माझं मत आहे. रोहित पवार यांनी संतोष बांगर आणि तानाजी सावंत यांची कागदपत्र पोलिसांना द्यावीत असेही धंगेकर म्हणाले. समीर पाटील हा माणूस सगळ्यांना पद आणि उमेदवारी देतो. पोलिसांवर समीर पाटीलचा अंकुश आहे. समीर पाटीलचे सगळे फोटो पाठवले आहेत, आता काय त्याचा नरडं धरायचं काय? असा सवाल धंगेकर यांनी केला. चोर कधी चोरी केली असं म्हणत नसतो. एकदा नेत्यासोबत फोटो काढू शकतात पण वारंवार त्याच नेत्यासोबत फोटो असतील तर काय म्हणायचं? असा सवालही धंगेकर यांनी केला.

**मत द्या नाहीतर देऊ नका, पण पुण्यातली गुन्हेगारी थांबली पाहिजे**

पुण्यातली दादागिरी थांबवली पाहिजे. ही दादागिरी थांबवली नाही तर पुणेकर मला माफ करणार नाहीत. चाळीस वर्षे झाले पुण्यात काम करतोय. राजकारण बाजूला ठेवा. आम्हाला मत द्या नाहीतर देऊ नका हा मुद्दा नाही पण पुण्यातली गुन्हेगारी थांबली पाहिजे. मी पुणेकरांसाठी बोलतो. माझा यात काही स्वार्थ नाही. कोथरुडची दादागिरी आतापर्यंतची सगळी आंदोलन मी टोकापर्यंत नेली आहेत. कोणतेही आंदोलन मध्ये सोडलं नाही. मी शिवसेना प्रमुखांचा कार्यकर्ता आहे. शिवसेना प्रमुख नेहमी म्हणायचे सत्ता समाजाच्या आड येत असेल तर आणि नागरिकांवर अन्याय होत असेल तर सत्तेला लाथ मारा आणि समाजासाठी काम करा असे धंगेकर म्हणाले.